# 3.3.2.1 Research Paper Published in UGC Care Listed Journals

17

# इतिहास संशोधन पध्दती

**प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा**
इतिहास विभाग प्रमुख,
विद्या विकास मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय
अक्कलकुवा, जि. नंदुरबार

**प्रस्तावनाः**

सामाजिक विज्ञानाच्या संशोधन पध्दतीपेक्षा इतिहासातील संशोधन पध्दती वेगळी आहे. प्रायोगिक संशोधन पध्दतीमध्ये निरीक्षणे वांरवार पाहिजे तितकी घेता येतात. परंतु इतिहासातील घटनांची पुनरावृत्ती करता येत नाही. ऐतिहासिक काळात जी घटना घडून गेलेली असते ती पुन्हा घडत नाही. इतिहासकार डॉ.चंद्रा व डॉ.वर्मा यांनी असे म्हटले आहे की, ?ऐतिहासिक संशोधन हे प्रयोगावर आधारित नसून ते निरीक्षणाच्या अहवालावर आधारित असते. आणि ज्याची पुनरावृत्त होऊ शकत नाही.? (Historical Research is not based upon experimentation but upon reports of observation which cannot be repeated१ ) ऐतिहासिक घटना घडून बराच कालावधी लोटल्यानंतर त्या घटनेचा शोध घेणे अवघड व क्लिस्ट असते. म्हणून त्याकरिता संशोधनासाठी उपयोगात आणावयाची साधनेसुध्दा वेगळी असतात. इतिहासाच्या भिन्न स्वरुपामुळे, इतर सामाजिक विज्ञान आणि इतिहासात काही बाबतीत फरक असतो. असे असले तरी सर्वसामान्य वैज्ञानिक पध्दती ऐतिहासिक संशोधनात देखील वापरता येते. ऐतिहासिक घटनांचे अध्ययन वैज्ञानिक पध्दतीने केले जाते. त्यालाच ऐतिहासिक संशोधन असे म्हटले जाते. ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**इतिहास संशोधन पध्दती (Research Methodology in History)**

**१. संशोधन समस्येची निवड (Selection of the Research Problem):**

संशोधन करतांना किंवा सर्वेक्षणाच्या प्रक्रियेमध्ये सर्वप्रथम संशोधन समस्येची निवड करावी लागते. समस्येची निवड करणे सहज आणि सोपे काम नाही. समस्येची निवड करतांना हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, त्या समस्येचे ऐतिहससिक विश्लेषण होऊ शकते का? तसेच समस्या अशा प्रकारची असावी की, त्याचे वर्तमानाशी संबधित अध्ययन केले जाऊ शकेल किंवा केवळ ऐतिहासिक अध्ययन शक्य होऊ शकेल. संशोधन समस्या किंवा विषय असा निवडला पाहिजे की, ज्याचे अध्ययन ऐतिहासिक संशोधन पध्दतीने करता येईल. उपलब्ध साहित्य, अध्ययन, आपली योग्यता, दुरदर्शिता, अंतर्दृष्टीच्या सहाय्यानें संशोधनकर्ता आपल्या संशोधन विषयाची निवड करतो.

संशोधन विषयाची निवड करतांना संशोधकाने आपल्या आवडीचा विषय निवडणे महत्वाचे असते. त्या विषयात त्याला रुची असणे आवश्यक आहे तरच विषयाची निवड करावी. संशोधकाला त्या विषयात पुर्वज्ञान असणे गरजेचे असते. जर विषय अवघड असेल तर संशोधनकार्य करण्यास अडचनी येतात. अनेकदा संशोधनकार्य अपूर्णच राहते. पैसा आणि श्रम वाया जातो. तसेच संशोधन विषयाची मर्यादा ठरवावी. त्याने त्याच विषयावर फोकस केला पाहिजे. त्याचबरोबर संशोधनकर्त्याने आपण निवडलेल्या विषयाचे महत्व काय आहे त्याला सामाजिक व ऐतिहासिक महत्व कसे राहिल हे संशोधनकर्त्याने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. तसेच संशोधनासाठी पैसा जास्त खर्च होतो. हे संशोधनकर्त्याने लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार करुनच संशोधनकर्त्याने आपल्या विषयाची निवड करावी.

**२. गृहितकृत्याची निर्मिती (Formulation of Hypothesis) :**

ऐतिहासिक संशोधनात गृहितकृत्ये हे फार महत्वाचे आहेत. ऐतिहासिक काळातील घटना, परिस्थिती इत्यादींचे प्रश्नाच्या स्वरुपात विश्लेषण करण्यासाठी गृहितकृत्ये उपयुक्त असतात. संशोधनकर्त्याला भूतकालीन घटनांची सप्रमाणता आणि विश्वसनीयता तपासून त्यांची कालक्रमानूसार मांडणी करावी लागते. म्हणून अशा संशोधनांमध्ये संशोधक कोणतेही गृहितकृत्ये मांडू शकत नाही. परंतू गृहितकृत्ये नसलेल्या अध्ययनाचे निष्कर्ष निघू शकत नाही व विश्लेषणही करता येत नाही. ऐतिहासिक संशोधनाकरिता गृहितकृत्य हे औपचारिक आणि ज्यांचे परिक्षण होऊ शकेल असे असू शकत नाही. ते स्पष्ट विधानाच्या स्वरुपात लिहिलेले असते. आणि ते घटनेचा वृत्तांत आणि परिस्थितीचा अंदाज स्पष्ट करु शकते.

वॅन डालेन यांच्या मते स्पष्ट विधान किंवा गृहितकृत्यांची

पध्दतशीर जागृतता ही तथ्ये महत्वपुर्ण आहेत काय याचे निर्धारण करणे, संशोधकर्त्याच्या कल्पना आणि तथ्यांमधील संबंध स्पष्ट करणे यासाठी उपयोगी असतात. तसेच त्यामुळे अनावश्यक, पक्षपाती, चुकीची किंवा जुने गृहितकृत्य मांडण्याची शक्यता कमी केली जाते. (An explicit statement, or a systematic awareness of the Hypothesis used in determining what facts were significant, clarifies the relationship between the investigators ideas and the facts be reports, and if minimizes the possibility of employing trivial, biased, conflicting, or archaic Hypothesis.२)

गृहितकृत्ये मांडतांना संशोधक प्रश्नांची निर्मिती करु शकतो, जी ऐतिहासिक घटनांचा शोध घेण्यासाठी अधिक उपयुक्त असतात. त्या प्रश्नांची उत्तरे पुरावा किंवा प्रमानाच्या आधारावर मिळविण्याच्या दृष्टीने संशोधक आपले संशोधन कार्य करु शकतो.

**३. तथ्यांचे संकलन (Collection of Data) :**

संशोधन विषयाची निवड आणि संशोधनाच्या संदर्भात स्पष्ट विधाने मांडल्यानंतर तथ्यांचे संकलन केले जाते. ऐतिहासिक तथ्यांचे संकलन करणे कठीण असते. म्हणून तथ्यांचे संकलन करतांना अत्यंत सतर्कता बाळगली पाहिजे. ऐतिहासिक तथ्यांचे प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन प्रकारची साधने आहेत. या दोन प्रकारच्या साधनांद्वारे ऐतिहासिक तथ्यांचे संकलन केले जाते.

**अ) प्राथमिक साधने (Primary Sources):**

ऐतिहासिक घटना घडत असतांना प्रत्यक्ष साक्षीदार असलेल्या व्यक्तीने लिहून ठेवलेल्या, निर्माण केलेल्या किंवा तसल्यास इतर प्रकारच्या साधनांना प्राथमिक साधने असे म्हणतात. प्रत्यक्ष डोळ्यांनी साक्ष असलेले विवरण हे ऐतिहासिक चौंकशीचे ठोस आधार असते. संशोधक गुड, बार आणि स्केटस यांनी त्यास तथ्यांचा पहिला साक्षीदार (First Witnesses to a Fact३) असे संबोधले आहे. अवशेष किंवा मुळ रेकॉर्डस यांचा समावेश प्राथमिक साधनांमध्ये केला जातो. ते लिखित, चित्रमय, मौखिक प्रमाण, तांत्रिक रेकॉर्डस इत्यादी स्वरुपामध्ये असतो.

ऐतिहासिक प्राथमिक साधने पुढीलप्रमाणे :

१) उत्खनन
२) पुराणवस्तू
३) नाणी
४) शिलालेख
५) ताम्रपट
६) चित्र
७) नकाशे
८) स्थापत्य मंदिर
९) किल्ले, महल
१०) भौतिक अवशेष
११) समकालीन कागदपत्रे
१२) गुप्त पत्रव्यवहार
१३) जमाखर्च नोंदी
१४) प्रश्नावली
१५) धार्मिक सनदा
१६) वत्तपत्रे
१७) आत्मचरित्रे व आठवणी
१८) राजकिय तह व करार
१९) रोजनिशी
२०) राज्यकारभाराची पत्रे
२१) खाजगी पत्रे

वरील साधने ही प्राथमिक साधनांमध्ये समाविष्ट केलेली आहेत. ऐतिहासिक संशोधनासाठी ही साधने अतिशय उपयुक्त आहेत. ज्यावेळी घटना घडत असते, ती घटना एखाद्या व्यक्तीने स्वत:च्या डोळयांनी पाहिलेली असते, ती साधने म्हणजेच प्राथमिक साधने होय.

**ब) दुय्यम साधने (Secondary Sources) :**

घटना घडून गेल्यानंतर त्या घटनेविषयी कुणाला तरी माहिती कळते, कुणाकडून ती माहिती ऐकली जाते. ती नोंदवली जाते. किंवा व्यक्तीने घटना, वस्तू किंवा परिस्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण न करता अहवालाद्वारे पुरविलेली माहिती म्हणजेच दुय्यम साधने होय. यामध्ये संशोधक प्रत्यक्ष साक्षीदार किंवा निरिक्षण करणाऱ्या व्यक्तीशी प्रत्यक्ष संपर्क साधून किंवा साक्षीदाराने लिहून ठेवलेली माहिती वाचून तथ्ये गोळा करतो. म्हणून अशा प्रकारच्या तथ्यास दुय्यम साधने असे म्हणतात. दुय्यम साधनाद्वारे मिळवलेली माहिती किंवा तथ्ये विश्वंसनीय, खरे नसतात. घटनेत सहभागी असणाऱ्या व्यक्तीच्या अहवालात देखील मतभेद आढळून येतात. अशावेळी घटनेला साक्षीदार नसणाऱ्या व्यक्तीकडून ऐकीव माहितीच्या आधारे दिलेल्या तपशिलात सत्यता असेलच, असे निश्चित सांगता येत नाही. म्हणून दुय्यम साधने किंवा साधनांचा उपयोग संशोधकर्त्याने अधिक विचारपूर्वक करण्याची आवश्यकता असते. दुसऱ्यांनी लिहिलेले अहवाल, पुस्तके इत्यादींचा दुय्यम साधनात समावेश होतो. संशोधनाचा प्रांरभ हा अशा प्रकारच्या दुय्यम साधनांच्या

आधारे होत असला तरी शेवटी संशोधकाला प्राथमिक साधनांद्वारे तथ्यांचे संकलन करुन सत्याचा शोध घ्यावा लागतो.

**ऐतिहासिक दुय्यम साधने पुढीलप्रमाणे :**

बखरी, वंशावळी, कुळवटी, महजर, करीने, शकावल्या, वाङ:मय, दंतकथा, पोथ्या, खंडकाव्य, आत्मचरित्रे, चरित्रे, बाडे (भाड) काव्य, साहित्य, म्हणी, दंतकथा, पोवाडे, इंटरनेट, इत्यादी.

एखादी घटना घडत असतांना ती प्रत्यक्ष पाहिलेली नसते. परंतू त्यानंतरच्या काळात किंवा केंव्हातरी लिहिलेली असते. ते साधन दुय्यम साधन होय.

अशाप्रकारे संशोधनकर्ता प्राथमिक आणि दुय्यम साधनांद्वारे तथ्याचे संकलन करतो. संशोधनकर्त्याला पुर्णपणे दुय्यम साधनांवर अवलंबून राहता येत नाही. दुय्यम साधनांद्वारे मिळविलेल्या दुय्यम तथ्यांच्या सत्यतेची शहानिशा अतिशय काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. तसेच प्राथमिक साधनांद्वारे प्राप्त केलेली माहिती ही पुर्णपणे खरी आहे का? असा प्रश्न स्वत: संशोधकर्त्याने उपस्थित करुन प्राथमिक तथ्यांची देखील वस्तूनिष्ठपणे तपासनी केली पाहिजे. जर ती तथ्ये वस्तूनिष्ठतेच्या कसोटीवर उतरत असेल तर ती सत्यता आणि प्रमाणित मानली पाहिजे.

**४. तथ्यांची मीमांसा (Criticism of Data):**

ऐतिहासिक संशोधनात प्रत्यक्ष निरीक्षणाची संधी प्राप्त होत नाही. तर त्या घटना कितीतरी वर्षापूर्वी घडून गेलेल्या असतात. ऐतिहासिक घटनांची पुनरावृत्ती करणे शक्य नाही. म्हणून घडून गेलेल्या घटनांची सत्यता आणि महत्वपुर्ण माहिती विविध साधनांच्या आधारे प्राप्त करावी लागते. तथ्य संकलन ज्या साधनांद्वारे करण्यात आले त्या साधनांच्या वैधतेवरच संकलित तथ्यांची वैधता अंवलंबून असते. म्हणून ज्या साधनांद्वारे तथ्ये संकलित करण्यात आली. त्या साधनांची वैधता तपासून घेतली पाहिजे. ज्या पुराव्यांच्या आधारे सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला असतो. ते पुरावे देखील काळजीपुर्वक तपासले पाहिजे. तसेच संकलित करण्यात आलेल्या तथ्यांची सुद्धा काळजीपूर्वक पडताळणी करणे अनिवार्य असते. कारण संकलित तथ्ये दोषपुर्ण असतील तर त्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष देखील चूकीचे राहतील. म्हणून संकलित माहिती किंवा तथ्याची मीमांसा केली पाहिजे. तथ्यांची मीमांसा केल्यानंतरच त्याचा ऐतिहासिक पुरावा म्हणून उपयोग करणेयोग्य असते. प्राप्त माहिती किंवा तथ्यांची मीमांसा ही दोन प्रकारे केली जाते.

**अ) बाहय मीमांसा किंवा बहिर्गत परीक्षण (External Criticism) :**

संशोधनकर्त्याने संकलित केलेली माहिती किंवा तथ्यांची विश्वसनियता निश्चित करण्याच्या प्रक्रियेला बाहय मीमांसा असे म्हणतात. बाहय मीमांसाला प्रतीची मीमांसा (Lower Criticism) म्हणतात. बाहय मीमांसेद्वारे ज्या स्त्रोताद्वारे तथ्याचे संकलन करण्यात आले त्या स्त्रोताच्या सत्यता आणि विश्वनियतेची तपासनी केली जाते. मौली यांच्यामते ?बाहय मीमांसेचा हेतू हा खूप नकारात्मक नसून ऐतिहासिक सत्याची स्थापना करणे हा आहे.? (The Purpose of external Criticism is not so much negative as it the establishment of Historical teuth४.)

ऐतिहासिक तथ्यांची यथार्थता निंश्चित करण्यासाठी संशोधनाजवळ भरपूर ऐतिहासिक आणि सामान्य ज्ञान असले पाहिजे. याबद्दल आपले विचार मांडतांना वॅन डालेन यांनी म्हटले आहे की, संशोधकाजवळ चांगल्या प्रकारच्या कालक्रमाचे ज्ञान, चपळ बुध्दी, चांगली विवेक बुध्दी, मानवी वर्तनास समजून घेण्याची बुध्दीमत्ता आणि चांगली भरपूर प्रमानात सहनशीलता आणि दृढता असली पाहिजे.? (The Researcher also need a good chronological sense, a versatile intellect, good common sense, an understanding of human behavior, and good plenty of patience and persistence.५)

अभिलेखाचा लेखक आणि काळ निश्चित करतांना स्वाक्षरी, हस्ताक्षर, लिपी, शुध्दलेखन, भाषा, शैली इत्यादीच्या आधारे निर्णय घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे शाई, रंग, कागद, शिला, वस्त्र, धातू, लाकूड इत्यादी गोष्टीचे भौतिक आणि रासायनिक परीक्षण करावे लागते. व्यक्ती, संस्था इत्यादी बाबतीत मिळनारी माहिती त्या विंशिष्ट कालखंडातील माहितीशी कितपत जुळते ते पाहणे आवश्यक आहे. बाहय मीमांसेमुळे प्राप्त माहितीमधील फसवेपणा दूर होतो. परंतु या मीमांसेचा मुख्य हेतू ती माहिती कितपत अधिकृत आहे, याचा तपास करणे हा आहे.

**ब) आंतरिक मीमांसा किंवा अंतर्गत परीक्षण (Internal Criticism) :**

संकलित कलेली माहिती किंवा तथ्यांच्या वैधतेचे मूल्यांकन करण्याच्या प्रक्रियेला आंतरिक मीमांसा किंवा अंतर्गत परीक्षण असे म्हणतात. प्राप्त माहिती किंवा तथ्ये ही अधिकृत असून देखील वैध नसण्याची शक्याता असते. प्राप्त माहिती व तथ्याची अचूकता व गुणवत्ता तपासणे हा आंतरीक परीक्षणेचा

हेतू आहे. अनेकदा मूळ लेखात अनेक प्रकारचे बदल घडून येत असतात उदा. शब्दात बदल करणे, काही माहिती त्यातून काढून टाकणे, नवीन माहितीची भर घालणे, मूळ लेखातील क्रम बदलणे इत्यादी प्रकारचे बदल घडू शकतात. कधी कधी मूळप्रत जीर्ण झाल्यामुळे पुढील काळात नवीन प्रत तयार केली जाते. ज्यावेळी मूळप्रतीमध्ये बदल घडून येतो. मूळप्रतीतील अक्षर ओळखता न येणे, त्यातील काही भाग नष्ट होणे किंवा पुसट होणे यामुळे देखील मुळप्रतीत बदल होत गेल्यामुळे शेवटची प्रत पहिल्या मुळ प्रतीहून अगदी भिन्न असण्याची शक्यता असते. म्हणून लेखातील मूळ भाग कोणता याची काळजीपूर्वक मीमांसा करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक तथ्यांची बाहय व आंतरिक मीमांसा करण्याच्या प्रक्रियेत संशोधकाला उपयोगी असणाऱ्या प्रश्नांची सूची गुड, बार आणि स्केटस यांनी दिली आहे.६ ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) लेखक कोण होता? यामध्ये केवळ त्याचे नावच नाही तर त्याचे व्यक्तीमत्व, चारित्र्य, स्थान इत्यादी कसे होते.

२) एक वार्ताहर किंवा वृत्तांत निवेदक म्हणून त्याची सामान्य पात्रता, चपळता, चारित्र्य, पक्षपात इत्यादी कशी होती.

३) एक वार्ताहर किंवा वृत्तांत निवेदक म्हणून त्याची पात्रता आणि अपात्रता कोणती होती?

अ) घटनांच्या संबधात त्याला रुची होती काय?

ब) घटनांच्या निरीक्षणासाठी त्याने कशा प्रकारचा संबध प्रस्थापित केला?

क) घटनांच्या वृत्तांतासाठी आणि शिकण्यासाठी त्याच्याजवळ आवश्यक सामान्य आणि तांत्रिक ज्ञान होते काय?

४) घटनेनंतर किती लवकत त्याने त्यांचा वृत्तांत लिहिला?

५) स्मृतीच्या आधारे इतरांशी परामर्श घेतल्यानंतर, तथ्यांची सत्यता प्रमाणित केल्यानंतर किंवा सरुवातीच्या परीक्षा घेतलेल्या ड्राप्टचे एकत्रीकरण करुन प्रलेख लिहिला आहे काय?

६) हा प्रलेख इतर प्रलेखांशी कसा संबधीत आहे?

संशोधकाला वरील सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाल्यानंतर त्याला पुराव्यावर अशत: अवलंबून राहावे लागते. पुढे फार परिक्षण करण्याची आवश्यकता नाही. अशावेळी त्याला माहितीमधील दरी भरुन काढण्यासाठी तांत्रिक निगमनाच्या अनुमानावर अवलंबून राहावे लागते.

**५) तथ्यांचे निर्वचन (Interpretation of Data):**

तथ्यांचे संकलन आणि मीमांसा केल्यानंतर अध्ययन समस्येच्या अनुषंगाने तथ्यांचे निर्वचन करावे लागते. तथ्यांचे निर्वचन कार्य अतिशय गुंतागुंतीचे बनते आणि ऐतिहासिक तथ्यांच्या अद्वितीय किंवा वेगळ्या स्वरुपाचे विशेष महत्व प्राप्त होते. त्यामुळे संशोधकाजवळ विशेष कौशल्य आणि कल्पनाशक्ती असणे आवश्यक असते. ऐतिहासिक स्वरुपाच्या संशोधनामध्ये संशोधकाला कारणे आणि परिणामांचे विवेचन करतांना अतिशय सावधगिरी बाळगावी लागते. कारण त्याचे स्थान नैसर्गिक किंवा भौतिक विज्ञानाच्या संशोधकापेक्षा पुर्णत: वेगळे असते. भौतिक विज्ञानाचा संशोधक हा प्रयोगशाळेत एकटा बसून प्रयोग करीत असतो. तो प्रयोगशाळेत प्रयोग करुन आपले निष्कर्ष मांडतो. परंतू ऐतिहासिक संशोधन करणाऱ्या संशोधकाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. ऐतिहासिक कारणे ही अचल आणि गुंतागुतीची असतात. ऐतिहासिक संशोधकाला अशी तथ्ये स्विकारावी लागतात की जी केसेसची कारणे आणि परिणामांशी स्पष्टपणे संबधीत नाही. म्हणून मौली यांनी नमूद केले आहे की, ?कारणत्व ही विज्ञानातील त्रासदायक संकल्पना आहे. ऐतिहासिक संशोधनांमध्ये तर ती दुप्पट त्रासदायक आहे. कारण त्यांमध्ये कारणे ही नियंत्रित वैज्ञानिक चेतनेऐवजी ऐतिहासिक स्वरुपाची किंवा आधिच निर्माण झालेल्या घटकाच्या स्वरुपात असतात.? (Causation is a troublesome concept in science it is doubly so in historical research where causes are in the nature of antecedents or precipitating factors, rather than causes in restricted scientific sense७)

**६.संशोधन अहवाल लेखन (Writing of ths Research Report):**

संशोधनातील तथ्यांचे निर्वचन केल्यानंतर त्या संशोधनाचा अतिशय व्यवस्थित आणि क्रमबध्द अहवाल लिहिणे आवश्यक आहे. संशोधनाच्या अहवालामध्ये समस्याकथन किंवा समस्याचे विधान, संबधित साहित्याचे समालोचन, संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहितकृत्ये, सर्व्हे आणि तथ्यांचा स्त्रोत, तथ्य संकलन करण्याची पद्धत, तथ्यांचे वर्गीकरण, तथ्यांचा क्रम, मीमांसा, तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन, निष्कर्ष आणि संदर्भ ग्रंथसूची या सर्व गोष्टींचा समावेश करणे आवश्यक आहे. संशोधन अहवालाचे लेखन करण्यासाठी संशोधकाजवळ उच्च प्रकारची विद्वता असली पाहिजे. हे विश्लेषणात्मक कौशल्याचे काम आहे. म्हणून कल्पकता आणि प्रतिभेच्या गुणवत्ता व्यतिरीक्त सर्जनशिलता आवश्यक आहे. संशोधन अहवाल लिहिण्याच्या शैलीमध्ये संशोधक हा वस्तूनिष्ठ असला पाहिजे. खंडित आणि अपूर्ण स्वरुपाच्या ऐतिहासिक तथ्यांच्या आधारावर प्रमाणित सामान्यीकरण प्रस्थापित केले जाते. म्हणून सामान्यपणे हे मान्य करण्यात आले की, संशोधकाला

ऐतिहासिक संशोधन अहवाल लिहितांना विषयनिष्ठ निर्वचन करण्याचे थोडे फार स्वातंत्र्य दिले पाहिजे. संशोधन अहवाल लिहितांना खात्री करुन घेतली पाहिजे की, संशोधन अहवाल पुरेसा व्यवस्थित आणि सत्यतेला कोणता बाधा आणणारा नाही.

अनेकदा ऐतिहासिक तथ्यांमधील पोकळीमुळे निर्वचन हे निरर्थक आणि असुरक्षित होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत संशोधकाने त्या तथ्यांमधील पोकळी स्पष्टपणे दर्शवावी आणि त्याने तेथेच थांबावे. असे असले तरी संशोधक पर्यायी विश्लेषण सुचवू शकतो. ऐतिहासिक संशोधनाचा अहवाल हा रुक्ष आणि आकर्षक नसलेला, शोभेचा आणि अलंकारिक नसावा. संशोधन अहवाल लक्षनाच्या शैलीतध्ये सत्यता, नियमितता, स्पष्टता आणि महत्वता असली पाहिजे८.

**७. निष्कर्ष :**

ऐतिहासिक संशोधन करत असतांना संशोधकाने संशोधनाच्या पायऱ्या (Steps of Histological Research) नूसार संशोधन करणे गरजेचे असते. संशोधनाचे विविघ टप्पे आहेत त्यामध्ये संशोधकाने सोपा, स्वत:ला समजेल रुचेल पचेल असा विषय निवडावा तसेच संबधीत विषयात संशोधन झाले नसावे. ते पडताळून पाहणे. संशोधनाची रुपरेषा तयार करतांना गृहितकृत्ये निश्चित करावेत त्यावरच संशोधनाचे विश्लेषन व निष्कर्ष तयार केला जातो. संशोधन करत असतांना प्राथमिक साधनांचा वापर करावा. तरच संशोधन दर्जेदार असते. संशोधनांचे जे साधने गोळा केलेत त्यांचे बाहय व आंतरिक परिक्षण करणे महत्वाचे असते आपल्या विषयाशी संबधीत साधने निश्चित करणे. त्यानंतर संशोधन अहवाल लेखन करण्यास सुरुवात करावी. ठरावीक ठिकाणी तळटिपा देण्याचे करावे. संशोधनाच्या शेवटी संदर्भ ग्रंथ सूची देण्याचे करावे

**८.संदर्भ ग्रंथ सूची :**

१) Soti shivendra Chandra and Rajendra k. Sharma, - Research in Education Atlantic Publishers and Distributors, New Delhi, १९९७, P.N..३४३.

२) Van Dalen, D.B.- Understanding Education Research, १९७३, P.N.७७.

३) Good, Barr, and Scaters, - Methodology of Educational Research, - Appleton Century, Crofts, Inc., १९३५, P.N.२५३.

४) Mouly G.J. - The Science of Educational Research,- Van Nostrand Ringhart Company, १९७०, P.N.२७०.

५) Van Dalen, Op. cit., P.N.२७०.

६) Good, Barr, and Scates, Op., cit.,P.N. २५९.

७) Mouly G.J, Op. cit., P.N.२१४.

८) John W. Best and James V. Khan - Research in Education , Prentice Hall of India, Private Limited, New Delhi, १९८९, P.N. ७२ & ७३.

❑❑❑

Drishtikon
(UGC Care Journal)

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

# ब्रिटिश सत्तेविरुध्द खानदेशात आदिवासी क्रांतिकारकांनी केलेला उठाव

**प्रा. डॉ. भामरे नानाजी दगा**
इतिहास विभाग प्रमुख
विद्या विकास मंडळाचे, कला व वाणिज्य
महाविद्यालय, अक्कलकुवा, जि.नंदुरबार (महाराष्ट्र)
email : nanajibhamare@gmail.com

**गोषवारा (Abstract) :**

भारतात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात अनेक राज्यात आहे. महाराष्ट्रातही आदिवासींच्या संख्येचे प्रमाण खूपच आहे. हा आदिवासी समाज विखूरलेल्या स्वरूपात आहे. आदिवासी समाजाची फार मोठी संस्कृती आहे. त्यांचे सण-उत्सवामुळे भारतीय संस्कृती टिकून आहे. या आदिवासी समाजाचे प्राचीन काळापासून जंगलावरती अधिसत्ता आहे. जंगलातील जी संपत्ती आहे, त्यांच्यावरती नैसर्गिक आमचाच अधिकार आहे. जंगलातील लाकूड, कंदमुळे, फळे, इत्यादीवरील अधिकार आमचाच आहे, अशी समज आदिवासी समाजाची होती. परंतू ब्रिटिशांनी भारतात सत्ता प्रस्थापित केल्यानंतर त्यांनी वेगवेगळे कायदे तयार केलेत. त्या कायद्यान्वये वनजमीनीवरील अधिकार शासणाचा निर्माण झाला. यामुळे आदिवासी समाजाचे उदरनिर्वाहाचे साधने नष्ट झाली. त्यांनी ब्रिटिश सत्तेला प्रतिकार करावयास सुरूवात केली. त्यातून संपूर्ण भारतात उठाव झालेत. खानदेशात खाजा नाईक, मेवाश्या नाईक, भिमा नाईक, नगर जिल्ह्यातील भागोजी नाईक यांनी आपल्या भोवती आदिवासी लढवय्यांना एकत्र केले. खाजाने ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असलेल्या धुळे भागातील सपाटी प्रदेशातील खेड्यांवर छापे टाकण्यास सुरुवात

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

केली. खाजा नाईकने बंडाचे निशान उभारल्यावर खानदेशातील अनेक बंडखोर नेते आपल्या अनुयायांसह त्याला येवून मिळालेत. काजीसिंग हा भिल्लांचा खरा नायक होता. सेंधवा ते शिरपूर हा चाळीस मैलाचा रस्ता त्याच्या देखरेखीखाली होता. सन १८५७ चा उठाव उत्तर भारतातून खानदेशात येवून पोहचला. दिल्लीच्या बादशहाने आम्हाला आदेश दिला आहे. आपला हा लढा गोऱ्या लोकांविरुध्द आहे. त्यांच्यापासून मुक्त करण्यासाठी आहे. म्हणून या लढ्यात सर्वांनी सामील व्हावे. अशी गर्जना करत खानदेशात उठावाची मशाल काजीसिंग यांनी पेटवून तिचे नेतृत्व स्विकारले. त्याच्या लढ्यात भीमा नाईक, महादेव नाईक, दौलू नाईक, अक्राणीचा काळू बाबा, आनंदा नाईक, भागोजी नाईक, भाऊसिंग रावल, मंदाण्याचा रमत्या नाईक हे सर्व भिल्ल प्रमुख नायक सैन्यासह सामील झाले. काजीसिंग व भिमा नाईकाच्या नेतृत्वाखाली १५०० लोकांची फौज तयार झाली. त्यासाठी शस्त्रास्त्रे, दारुगोळा, रसद इत्यादीची खरेदी करण्यासाठी आर्थिक प्रश्न निर्माण झाला. ही अडचण निवारण्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी छापे घालणे सुरु केले. १७ नोव्हेंबर १८५७ रोजी इंदौरकडून ब्रिटिश खजिना मंबईकडे जात होता. तो अनेक पिशव्यांमध्ये भरला होता. त्याच्या संरक्षणासाठी धीग्रज व चतुर्भूज हे दोन अधिकारी आणि त्यांच्या मदतीसाठी २०० सैनिक होते. त्यांच्या देखरेखीखाली हा खजिना मुंबईकडे जात होता. तो सेंधवा घाटात येताच काजीसिंग, भिमा नाईक, त्यांचे ३०० साथीदारासह भिल्लांनी जांभळी चौकी जवळ हल्ला केला. खजिन्याचे संरक्षक पळून गेले. हा खजिना एकून सात लाखाचा होता. भिल्ल क्रांतिकारकांनी हा खजिना लुटून ब्रिटिशांना जबरदस्त धक्का दिला. याचबरोबर भीमा नाईक, काळू बाबा यांनीही ब्रिटिशांविरूध्द उठाव केलेत. सातपुड्यातील अंबापाणी याठिकाणी आदिवासी आणि ब्रिटिशांमध्ये लढाई झाली. यालाच अंबापाणीची लढाई असे म्हणतात. या लढाईत आदिवासी स्त्रियांनीही सहभाग घेतला होता. पण अंबापाणीच्या लढाईत आदिवासींचा पराभव झाला. परंतू त्यात अभिमान वाटावा अशी घटना आहे की, स्वातंत्र्यासाठी बंडखोरी, संघर्ष व बलिदानाची पंरपरा

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

आदिवासी समाजात दिसून येते. परंतू आदिवासी क्रांतीकारकांकडे अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे ते पराभूत झालेत. भारतीय इतिहासात आदिवासी क्रांतीकीरकांनी जे उठाव केलेत त्याला अनण्य साधारण असे महत्त्व आहे.

**प्रस्तावना :**

भारतात ब्रिटिश सत्ता प्रस्थापित होत असताना आदिवासी समाज हा स्वतंत्र वृत्तीने जगत होता. काही प्रदेशात ते स्वतंत्र राजे व संस्थानिकही होते. आणि इतर आदिवासी समाजाचा जंगलावरती त्यांचाच अधिकार चालत होता. त्यातूनच त्यांचा उदरनिर्वाह होत असे. मात्र ब्रिटिशांनी वेगवेगळे कायदे तयार करुन त्यांचा जंगलावरती व वनजमीनीवरील अधिकार काढून टाकला. त्यातूनच आदिवासी क्रांतीकारकांनी ब्रिटिशांविरुध्द उठाव केलेत. त्याचकाळात भारतात १८५७ चा उठाव घडून आला. या उठावाला भारतीय इतिहासात अनण्य साधारण असे महत्त्व आहे.

खानदेशात १८५७ च्या उठावात आदिवासी क्रांतिकारकांचे फार मोठे योगदान आहे. त्यांचे स्वातंत्र्य लढ्यात कर्तृत्त्व व कार्यही मोठे असून इतिहसामध्ये मात्र त्यांना स्थान नाही. परंतू इतर क्रांतिकारक व स्वातंत्र्य सैनिकांपेक्षा त्यांची राष्ट्रभक्ती तीळमात्र कमी नव्हती हे त्यांच्या कार्याने सिध्द झाले आहे.[१] सन १८५७ च्या उठावात समकालीन कागदपत्रात आणि ग्रंथात व त्यावेळच्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या सहकारी गुप्त अहवालांचा (सी.आय.डी.रिपोर्ट) शोध घेतल्यास खानदेश व त्यालगतच्या प्रदेशातील आदिवासी स्वातंत्र्यप्रेमी वीरांनी ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या अन्यायी सत्तेला जबरदस्त हादरा दिला. या लढ्यात त्यांनी प्राणाची आहुती दिली. या स्वातंत्र्य लढयात ज्या वीरांनी आपल्या प्राणाची आहुती लावली. त्या उपेक्षितांची माहिती घेतल्यास अंगावर शहारे उभे राहतात. त्यांच्या निस्सीम त्यागाचे, बलिदानाचे चित्र आपल्यासमोर

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

उभे राहते. जन्मठेप, काळ्या पाण्याची शिक्षा, बंदुकीच्या गोळ्या छातीवर झेलणे, तोफेच्या तोंडी जाणे, फासावर लटकणे यातच हे क्रांतिकारक स्वतःला धन्य मानत होते.[२]

**काजीसिंग (खाजा नाईक) ::**

खानदेशात खाजा नाईक, मेवाश्या नाईक, भिमा नाईक, नगर जिल्यातील भागोजी नाईक यांनी आपल्या भोवती आदिवासी लढवय्यांना एकत्र केले. खाजाने ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असलेल्या धुळे भागातील सपाटी प्रदेशातील खेड्यांवर छापे टाकण्यास सुरुवात केली. खाजा नाईकने बंडाचे निशान उभारल्यावर खानदेशातील अनेक बंडखोर नेते आपल्या अनुयायासह त्याला येवून मिळाले. खाजाने सेंधवा घाटावर आपला कब्जा केला. येणाऱ्या-जाणाऱ्या माल भरलेल्या बैलगाडीकडून कर वसूल करावयास सुरुवात केली. आपण सरकार असल्यासारखे तो वागू लागला. ब्रिटिश सत्ताधिशांचा अधिकार नाकारुन आपण या देशाचे राज्यकर्ते आहोत असा त्याचा वागण्याचा प्रयत्न होता. काजीसिंग हा भिल्लांचा खरा नायक होता. सेंधवा ते शिरपूर हा चाळीस मैलाचा रस्ता त्याच्या देखरेखीखाली होता. ह्या रस्त्यावर त्याने १८३१ ते १८५१ ह्या काळात उत्तम बंदोबस्त ठेवला आणि फारसे गुन्हे होऊ दिले नाहीत. परंतू १८५१ मध्ये एका गुन्हेगारांचा कबूली जबाब घेतांना त्याचा मृत्यू झाला. तो आरोप काजीसिंगवर ठेवण्यात आला. त्याविरुध्द न्यायालयात खटला भरण्यात आला आणि त्याला दहा वर्षाची शिक्षा झाली. परंतू त्याने इमान इतबारे ब्रिटिशांची सेवा केल्यामुळे त्याची पाच वर्षातच सुटका केली. पुन्हा तो ब्रिटिशांच्या नोकरीत लागला. आणि प्रामाणिकपणे सेवा करु लागला.[3]

सन १८५७ चा उठाव सुरु झाला. त्यामुळे काजीसिंगची सैन्यात भरती करण्यात आली. सेंधवा ते शिरपूर घाटावरच त्याची नियुक्ती करण्यात आली. त्यावेळी त्याच्या हातून लहानशी चुक झाली. त्यामुळे कॅप्टन बर्थने त्यास अपमानीत केले. काजीसिंगचा स्वाभिमान जागा झाला.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

नोकरीचा राजीनामा देऊन तो स्वतंत्र झाला. व त्याने आपल्या लोकांना एकत्र केले आणि सैन्य निर्माण केले. असंतुष्ट भिल्ल सैनिक त्याला येवून मिळाले.[४]

सन १८५७ चा उठाव उत्तर भारतातून खानदेशात येवून पोहचला. दिल्लीच्या बादशहाने आम्हाला आदेश दिला आहे. आपला हा लढा गोऱ्या लोकांविरुध्द आहे. त्यांच्यापासून मुक्त करण्यासाठी आहे. म्हणून या लढ्यात सर्वांनी सामील व्हावे अशी गर्जना करत खानदेशात उठावाची मशाल काजीसिंग यांनी पेटवून तिचे नेतृत्त्व स्विकारले. त्याच्या लढ्यात भीमा नाईक, महादेव नाईक, दौलू नाईक, अक्राणीचा काळु बाबा, आनंदा नाईक, भागोजी नाईक, भाऊसिंग रावल, मंदाण्याचा रमत्या नाईक हे सर्व भिल्ल प्रमुख नायक सैन्यासह सामील झाले.[५] त्याचबरोबर धार व होळकरांच्या इंदौर संस्थानिकांच्या सेवेतील कमी झालेले भिल्ल सैनिक व त्यांच्या सोबत महिला देखील सैन्यात सामील झाल्या. आणि एकुण १५०० पेक्षा जास्त सैनिकांची संख्या तयार झाली.[६]

**सात लाख खजिन्याची लूट** ः

काजीसिंग व भिमा नाईकाच्या नेतृत्वाखाली १५०० लोकांची फौज तयार झाली. त्यासाठी शस्त्रास्त्रे, दारुगोळा, रसद इत्यादीची खरेदी करण्यासाठी आर्थिक प्रश्न निर्माण झाला. ही अडचण निवारण्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी छापे घालणे सुरु केले. १७ नोव्हेंबर १८५७ रोजी इंदौरकडून ब्रिटिश खजिना मुंबईकडे जात होता. तो अनेक पिशव्यांमध्ये भरला होता. त्याच्या संरक्षणासाठी धीग्रज व चतुर्भूज हे दोन अधिकारी आणि त्यांच्या मदतीसाठी २०० सैनिक होते. त्यांच्या देखरेखीखाली हा खजिना मुंबईकडे जात होता. तो सेंधवा घाटात येताच काजीसिंग, भिमा नाईक त्यांचे ३०० साथीदारासह भिल्लांनी जांभळी चौकी जवळ हल्ला केला. खजिन्याचे संरक्षक पळून गेले. हा खजिना एकुण सात लाखाचा होता. भिल्ल क्रांतिकारकांनी हा खजिना लुटून ब्रिटिशांना

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

जबरदस्त धक्का दिला. यानंतर काजीसिंग व त्याचे साथीदार शांत बसले नाहीत. त्यांनी मुंबईकडे जाणाऱ्या ६० अफूच्या गाड्या लुटल्या. पोस्ट ऑफिस लुटले. सेंधवा घाटातील टेलीग्राफच्या तारा तोडल्या. यावरुन असे दिसत होते की सेंधवा घाटात काजीसिंग याने आपले वर्चस्व निर्माण केलेले होते. याचबरोबर नगर, नाशिकच्या बाजुने भागोजी नाईकाने भिमा व काजीसिंग यांना मदत केल्याचे दिसते. नंदुरबार, सुलतानपूर, शहादा परिसरातूनही आक्रमणे झाल्याचे दिसून येते. ब्रिटिशांचे दळणवळण विस्कळीत करुन टाकले होते. यामुळे ब्रिटिशांना भिल्ल क्रांतिकारकांची भिती वाटू लागली.[७]

**भीमा नाईक** ः

भीमा नाईक हे १८५७ च्या उठावातील अंत्यत गूढ असे व्यक्तीमत्व होते. या बंडाच्या तयारीत तो अगोदर पासूनच कार्यरत होता. परंतू हा उठाव ब्रिटिशांनी मोडून काढल्यावर बहुतेक बंडखोर नेते मारले गेल्यावर किंवा देशोधडीला लागल्यावर मात्र भीमा नाईकाने दहा वर्षे ब्रिटिशंविरुध्द लढा दिला. नासिक, नगर व निमाड भागातील भिल्लांना एकत्र केले. नगरमध्ये संगमनेर क्षेत्रात ब्रिटिशांविरुध्द भागोजी नाईकाने काजीसिंगला येवून मिळण्याचा प्रयत्न केला. तो प्रयत्न ब्रिटिशांनी हानून पाडला. भीमा नाईकाने स्पष्ट केले की मला दिल्लीचा बादशहाने खानदेश मुक्त करण्याचा आदेश दिला आहे. हा आपला लढा हिंदुस्थानला ब्रिटिश सत्तेपासून मुक्त करण्यासाठी आहे. म्हणून आपण ब्रिटिशांच्या सैन्यात व पोलिसात नोकरी करणाऱ्यांनी बंडात सामील व्हावे, अशा या निःस्वार्थी क्रांतिकारकाचा लढा होता.[८] या शूरसेनानी भीमा नाईकाच्या पूर्वाआयुष्याबद्दल इतिहास ज्ञात नाही. तो कुठल्या गावाचा होता, सैन्यात होता का? की पोलिसात होता? याबद्दल पुरावे सापडत नाही. मुलाखतीद्वारे अशी आख्यायिका सांगितली जाते की, तो आदिवासी भागातील रजपूत समाजाचा होता. पंरतु भिल्ल समाजाशी त्याचे आपलेपणाचे संबध

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

होते. एका रात्री त्याने जाळ्या लावून, हाका देवून निलगायीची शिकार केली आणि तिचे मांस खाल्ले. त्यामुळे त्याला जातीबाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्याच्यापुढील माहिती या क्रांतिकारकाविषयी सापडत नाही.[९]

**काळूबाबा** ::

हा खानदेशातील रजपूत जमीनदार होता. त्यालाही इंग्रजांनी छळल्यामुळे तो त्यांच्या विरोधात गेला. तो अक्राणी परगण्यात येवून त्याने आदिवासी भिल्लांना उठावासाठी प्रवृत्त केले. त्याने त्या भागात हक्क सांगून तेथे तो महसूल गोळा करु लागला व आपण स्वतंत्र आहोत असे जाहीर केले. ५ जानेवारी १८५८ रोजी शहाद्यापासून ९ कि.मी. अंतरावरील खेडी त्याने ४० घोडेस्वार, २०० हत्यारबंद भिल्ल क्रांतिवीरांना घेवून लूट केली. सहा जमीनदारांना पकडले व त्यांच्याकडून बाराशे रुपये घेवून त्यांना सोडून दिले. कॅ.सीऍलने त्याचा बंदोबस्त केला. तेंव्हा त्याने माघार घेतली आणि तो बडवानीकडे निघू गेला.[१०]

**क्रांतिकारी भिल्लांचा चार लाख खजिना लुटण्याचा अशस्वी प्रयत्न** ::

सेंधवा घाटातून होळकरांकडून चार लाखांचा खजिना मुंबईकडे पाठवला जात असल्याची बातमी क्रांतिकारी भिल्लांना माहिती मिळाली. तो त्यांनी घाटात अडविण्याचा प्रयत्न केला. पंरतू त्यांना यश मिळाले नाही. ब्रिटिश सैन्यामध्ये त्यांची चकमक झाली. यामध्ये ४० ते ५० भिल्ल क्रांतिवीर शहिद झालेत.

ब्रिटिशांच्या दडपशाहीपुढे भिल्ल क्रांतिकारक झुकले नाहीत. तर त्यांनी जोमाने प्रतिकार केला. भागोजी नाईकाने सुरगाण्याच्या २०० कि.मी. परिसरात व बागलाणकडे आपला मोर्चा वळवला. १९ फेब्रुवारी १८५८ मध्ये मेजर पॉर्टीकर व कॅ.नुट्टलने भागोजीवर हल्ला केला. त्यामध्ये

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

४० भिल्ल क्रांतिकारक शहिद झाले. पाच कैदी म्हणून पकडले गेले. चार इंग्रज सैनिक मारले गेले आणि तीन जखमी झाले.११

**मेजर ईव्हान्सने शांततेसाठी केलेले प्रयत्न ः**

खानदेशात भिल्ल क्रांतिकारकांचा उपद्रव वाढत गेला. त्यांनी ठिकठिकाणी ब्रिटिशांवर हल्ले करणे सुरु केले. ब्रिटिशांनी देखील क्रांतिकारी भिल्लांना नष्ट करण्यासाठी जंग सुरु केली. पण तेही ब्रिटिशांना पुरुन उरले. तेव्हा मेजर ईव्हान्सने भीमा नाईक आणि मोवासिया नाईक यांना वाटाघाटीसाठी बोलावले. ब्रिटिशांचे सामर्थ्य किती प्रचंड आहे, हे त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण सारे व्यर्थ झाले. या वाटाघाटीतून काहीच निष्पन्न निघाले नाही. आणि संघर्ष चालूच राहिला.[१२]

**अंबापाणीची लढाई ः**

वाटाघाटी फिसकटल्यानंतर मेजर ईन्हासने भिल्ल सैनिकांवर कडाडून हल्ला केला. यावेळी मे.ईन्हान्सकडे १५०० सैनिक तर कॅ.लॉगस्टन ९०० सैनिकासह काजीसिंगवर हल्ला करण्यास निघाले. मेजर ईन्हान्सने बिध्या नाईक, रतनपूरचा रामसिंग व सुलतानपूर परगण्यातील वीरपूर गावचा विस्टा नाईक, काळुबाबा व दौलतसिंग यांना रसद पुरविल्याबद्दल अटक केली. विस्टा नाईकाला जन्मठेपेची शिक्षा दिली.[१३]

सातपुड्यातील अंबापाणी या ठिकाणी ११ एप्रिल १८५८ रोजी बंडखोरांना इंग्रजांनी कोंडीत पकडले. इंग्रजांकडे शस्त्रसज्ज, प्रशिक्षित फौजफाटा होता. तर काजीसिंग व त्यांच्या वीरांकडे साध्या बंदुकाही नव्हत्या. पण त्यांच्याकडे लढण्याची जिद्द होती. अशात युध्दास प्रारंभ झाला.[१४] मेजर इव्हान्स व लॉगस्टन यांनी समोरुन हल्ला केला. सकाळी आठ वाजता भिल्लांना ब्रिटिश सैन्याने घेरले. भिल्लांनी डोंगरमाथ्यावर लहान मोठ्या शिळांचा, तसेच गोफण व तिरकामठ्यांच्या

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

सहाय्याने हल्ला चढवून निकराची झुंज दिली. ब्रिटिशांच्या सैन्याचे नुकसान केले. गॅरिसन हा ब्रिटिश अधिकारी शौर्याने लढला. कॅ.बर्थ जखमी झाला. तर ले.बेसरी जास्त जखमी झाला. इंग्रजांकडे सर्व गोष्टी असूनही त्यांचे जबरदस्त नुकसान झाले. १६ सैनिक मारले गेले, ४५ जखमी झाले, ७ सैनिक बेपत्ता झाले. काजीसिंगचा पोरगा मारला गेला. ६५ क्रांतिवीर भिल्ल मारले गेले. ६२ भिल्लांना पकडले गेले. त्यापैकी ५७ भिल्लांना लष्करी ढोल वाजवून ठार मारले. २०० स्त्रिया व मुलांना पकडले. यामध्ये काजीसिंगच्या बायकांचाही समावेश होता. मेवासिया नाईकाची बहिण, भीमा नाईकाची पुतणी व भाऊ रावतची पत्नी या होत्या. २० भिल्ल क्रांतिकारकांना काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावून अंदमानात पाठवण्यात आले. आदिवासी वीरांनी गनिमी काव्याचा वापर करुन इंग्रजांना हैरान केले. दऱ्याखोऱ्यातील दगडगोट्यांचा शस्त्र म्हणून वापर केला. त्यांच्यापुढे इंग्रजांची आधुनिक शस्त्रास्त्रे निकामी ठरली. अंबापाणीचा रणसंग्राम खानदेशातील आदिवासींच्या लढ्यातील एक प्रेरणादायी व रोमहर्षक संघर्ष दिसून येतो.[१५]

**१५ भिल्ल स्त्रियांचा सहभाग ः**

अंबापाणीच्या युध्दात भिल्ल स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. हे एक विशेष समजले जाते. खानदेशवासियांच्या नव्हे तर भारतीयांच्यादृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. मेजर हॅसलवुड याने आपल्या पत्रात असे म्हटले आहे, की खाज्या नाईकांची पत्नी, बहीण, भीमा नाईक यांची पुतणी, भाऊ रावल यांची पत्नी यांना अटक केली गेली.[१६] अंबापाणीच्या लढाईत आदिवासींचा पराभव झाला, पंरतू त्यात अभिमान वाटावा अशी घटना आहे, की स्वातंत्र्यासाठी बंडखोरी, संघर्ष व बलिदानाची पंरपरा आहे. या अंबापाणीच्या युध्दात ४०० भिल्ल स्त्रिया पकडल्या गेल्या. जोपर्यंत भिल्ल नायक शरण येत नाही तोपर्यंत या स्त्रियांना सोडायचे नाही. असा आदेश ब्रिटिश सरकारने आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना दिले होते. असा आदेश देण्याचे कारण मुंबई

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

पोलिस गुप्त विभागात आढळून आले आहे. हे पत्र १ जून १८५८ चे आहे. या पत्रात भिल्ल स्त्रियांबद्दल असे म्हटले आहे, की भिल्ल पुरुष जितके उपद्रवी व सतावून सोडणारे आहेत, तितक्याच त्यांच्या स्त्रिया देखील आम्हांला उपद्रव देत आहेत व सतावून सोडत आहेत. आमच्या बातम्या काढून त्या आपल्या पुरुषांना कळविणे, पुरुषांसाठी भोजन तयार करणे, प्रसंगी लढाई करणे, ही सर्व कामे स्त्रिया करतात. म्हणून यांनाही पकडून तुंरुगात डांबून ठेवले पाहिजे. या स्त्रियांना केवळ तुरुंगातच डांबले नाही तर त्यावेळच्या फौजदाराने काही भिल्ल स्त्रियांवर अत्यंत क्रुर व पाशवी अत्याचार केल्याची हकीकत खानदेशचा मॅजिस्ट्रेट मेन्सफिल्ड याने पोलिस कमिशनरला कळवल्याची नोंद सापडते.[१७] खरे पाहता भिल्ल नायक शरण यावेत यासाठी त्यांच्या स्त्रियांना पकडून ठेवणे हा त्यांचा मागचा उद्देश होता.

अंबापाणी युध्दानंतर एका महिन्याने काळुबाबा व दौलतसिंग यांनी नर्मदा नदी ओलांडून आपली सुटका केली. काळुबाबा व त्याचा मुलगा तुम्बरसिंग हा मध्यभारतातील असिस्टंट जनरलचा मदतनीस ले.कॅनिंग याला शरण आला.[१८]

उत्तर भारतात उठाव संपुष्टात येत होता. पण खानदेशात खाजा नाईक, भीमा नाईक यांनी आपला लढा तसाच चालू ठेवला होता. १८५८ ला ब्रिटिश सरकारने खाजा नाईकला बिनशर्त माफी जाहिर केली, पण तो शरण आला नाही. त्याने छोट्या-मोठ्या चकमकी व लुटालुटी चालूच ठेवल्या होत्या. अंबापाणीच्या पराभवाचा बदला नांदगाववर हल्ला करुन घेतला. जानेवारी १८५९ मध्ये त्याने चाळीसगांवला धाडसी दरोडा घातला.[१९]

खाजा नाईक इंग्रजांना शरण येत नाही म्हणून इंग्रजांनी त्याला कपटाने अगर भेदनीतीचा वापर करुन या मार्गाने त्याला संपवायचे असे ठरवले. जमादार रोहिद्दीन नाईक याने पकडण्याचा प्रयत्न केला. पण तो अपयशी ठरला. १८६० मध्ये खाजाचा अंगरक्षक फितुर झाला. पैशाच्या


Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

लोभाने खाजा झोपला असतांना त्याच्या अंगरक्षकाने त्याचा खून केला. इंग्रजांनी त्याचे शीर कापून धरणगावंच्या इंग्रज वखारी शेजारील निंबाच्या झाडाला एक आठवडाभर टांगून ठेवले होते. आदिवासी बंडखोरांना वचक बसावी हा त्याचा मागचा उद्देश होता. खाजा नाईक शहिद झाल्यानंतर दुसऱ्याच वर्षी इंग्रजांशी संगमनेरजवळ झालेल्या संघर्षात भागोजी नाईकाला वीरमरण आले. परंतु भीमा नाईक मात्र एकाकी झुंज देत होता. १८६७ मध्ये भीमाने इंग्रजांविरुध्द उठाव केला. परंतु अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे तो पराभूत झाला. १८६७ मध्ये त्यास पकडून जन्मठेपेची शिक्षा ठोठावून देशाबाहेर त्याला काढण्यात आले.[२०]

**निष्कर्ष :**

खानदेशात आदिवासी क्रांतीकारकांनी ब्रिटिश सत्तेविरूध्द उठाव करून ब्रिटिशांना हैराण करून सोडले होते. त्यांनी ब्रिटिश खजिनाही लुटला होता. शेवटी ब्रिटिश सत्तेलाही आदिवासी क्रांतीकारकांसोबत समजोता तयार करावा लागला. खानदेशातील भिल्ल क्रांतिकारकांनी १८५७ च्या उठावात हिरिरीने सहभाग घेतल्याचे दिसून येते. खाजा नाईक, भागोजी नाईक, भीमाजी नाईक आणि त्यांच्या साथीदारांनी इंग्रजांना हैराण करून सोडले होते. सातपुड्यातील अंबापाणीच्या लढाईत आदिवासी क्रांतिकारकांसोबत स्त्रियांनी देखील सहभाग घेतला होता. परंतू आदिवासी क्रांतिकारकाजवळ लष्करी साधने तुटपुंजी असल्यामुळे त्यांचा पराभव झाला. परंतू १८५७ च्या उठावातील त्यांच्या राष्ट्रप्रेमाचा आणि बलिदानाचा त्याग दिसून येतो. यावरुन १८५७ च्या उठावात आदिवासी क्रांतिकारींना एक अनण्य साधारण महत्व आहे.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

**संदर्भ :**

१) भामरे सर्जेराव ज.-आदिवासींचे उठाव, प्रकाशक अपरांत पुणे, २०१५, पृ.क्रं.४२.

२) उपरोक्त

३) खानदेश जिल्हा गॅझेटिअर बॉम्बे १८८०, पृ.क्रं.३०९.

४) जळगांव जिल्हा गॅझेटिअर, मुंबई, १९९४, पृ.क्रं.१०९.

५) गारे गोविंद-सातपुडयातील भिल्ल, ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पु.क्रं.११७ ते १२०.

६) भामरे सर्जेराव ज.पुर्वोक्त पृ.क्रं.४३.

७) उपरोक्त

८) धुळे जिल्हा गॅझेटिअर बॉम्बे, १९७४, पृ.क्रं.१५९.

९) खानदेश जिल्हा गॅझेटिअर बॉम्बे १८८०, पृ.क्रं.३०९.

१०) भामरे सर्जेराव ज.-आदिवासीचे उठाव, प्रकाशक अपरांत पुणे,२०१५, पृ.क्रं.४८.

११) दिनानाथ मनोहर-भिल्ल आदिवासींचा स्वातंत्र्य लढा, प्रकाशन जनार्द आदिवासी विकास संस्था, शहादा, पृ.क्रं.३१.

१२) धुळे जिल्हा गॅझेटिअर बॉम्बे, १९७४, पृ.क्रं.१५९.

१३) उपरोक्त.

१४) उपरोक्त.

१५) भामरे सर्जेराव ज.-आदिवासीचे उठाव, प्रकाशक अपरांत पुणे,२०१५, पृ.क्रं.४९.

१६) धुळे जिल्हा गॅझेटिअर बॉम्बे, १९७४, पृ.क्रं.१५९.

१७) भामरे सर्जेराव ज.-आदिवासीचे उठाव, प्रकाशक अपरांत पुणे,२०१५, पृ.क्रं.५१-५२.

१८) उपरोक्त, पृ.क्रं.५२.

Copyright©authors

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

१९) गारे गोविंद, पूर्वोक्त, पृ.क्रं.१२७.

२०) भामरे सर्जेराव ज.-आदिवासीचे उठाव, प्रकाशक अपरांत पुणे, २०१५, पृ.क्रं.५३-५४.

Purakala
(UGC Care Journal)

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-52-June -2020

# Mahatma Gandhian Model of Education

**Prof. Dr. Bhamare Nanaji Daga**
*Head of Department History*
*V.V.Ms Arts & Commerce College,*
*Akkalkuwa, Dist – Nandurbar*
*(Maharashtra)*
*nanajibhamare@gmail.com*

**Abstract**

*If, we want to contain the values crises in Indian Education System Than we should go back to Mahatma Gandhian concept of Education. It is well known that Gandhi ji had devised a new scheme of education known as NaiTalim / Wardha Scheme / Basic Education. Primarily, Education was termed as basic as it was supposed to form the basics of our national Culture and Civilization to be Compulsory in our character. Mahatma Gandhi thoughts deeply about our education system and its problem like values in education, illiteracy, unemployment, and relation between job and education. It must be noted here that, Gandhi's ideas evolved into a coherent and consistent philosophy after many years of piece-meal experiments. His primary objective was to develop practical means of providing all Indians with the minimum education necessary to understand the complexities of their environment and to be self-sufficient within that environment.*

## 1) Education of body, Mind and Spirit-

Gandhi was a practical idealist. He looked man neither as mere intellect nor as the gross animal body, nor the heart and the soil alone. According to him a proper and harmonious combination of all there is required for the making of the whole man. By education he meant the making perfect man. In an issue of Harijan he says,[1] by education I mean an all round drawing out of the best in child and man-body, mind and spirit.

## 2) Mahatma Gandhiji View on illiteracy:

Mahatma Gandhi considered illiteracy as India's sin and shame and he wanted it to be uprooted.[2] He was fully convinced that illiteracy caused ignorance and ignorance always led to helplessness and back wardness. Therefore to get out the grip of helplessness, according to Gandhi, literacy is essential instrument for creating awareness among the people who are



Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-52-June -2020

illiterates and ignorant. However, Gandhi deplored mass ignorance more than mass illiteracy and Therefore, for education he wanted to have an intensive programme of driving out ignorance through carefully selected syllabus, according to which they would not only to educate the villagers but their mind also.

**3) Vocational Education:**

Gandhi ji Emphasized that education is incomplete without vocational training According to him education should revolve around vocational manual activities center and all syllabi should be woven round vocational training. Gandhi ji believes that handicrafts and small-scale village industries should make education self-supporting along with the development the personality of the child. We can understand that Gandhiji has already discussed the modern concept of "Learn by Earn" in his thought of Nay Talim. In his own words, "This education, ought to be for them a kind of insurance against unemployment[3]". Explaining the above idea he once elaborated, the child at the age of fourteen that is after finishing a seven years course should be discharged as an earning unit. Gandhiji scheme of education has specified the following four stages.

(a). Adult education

(b). Pre-basic education

(c). Basic education

(d). Post basic education or the education adolescents

**4) Education as character building:**

Gandhiji gave more importance to character building than literacy in his scheme of education. In his views, an unsophisticated shepherd to his possessed of character is much better citizen of the world than on has received the so-called literacy training in modern school. Once he said, Character building, I would try to develop courage, strength, virtue, ability to forget oneself in working towards great aims[4].


Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-52-June -2020

**5) Education should be interesting and accessible:**

According to Gandhiji education should be made interesting and accessible to all. We have to have before us the greater objective of making the citizens of our country education that is completed develop in body, mind and spirit. Education is continuing and unending process. About his thought as a teacher, he says that a good teacher I both a teacher and a taught. He teachers something to a Students and learns something while teaching and in this way education / learning is an unending process. It grows day by day.

**6) Child Centered Education:**

Though in Gandhiji´ s Scheme teacher hold an important place as a Guide in the education plan yet children remain the center of activities. Basic system regard child as the educational consumer, his needs therefore, have to be studied, understood, and met with carefully and very seriously. In India, where examination dominates the entire system of education, where child is expected to learn various subjects and to pass the examination. How can his personality be developed under the various circumstances? On the other hand, basic education proposed by Gandhi Seeks to eliminate these defects, as in it, child takes initiative himself and progress under the guidance of his teacher.[5]

**7) Cultural Aspect of Education:**

Gandhiji was distressed to see the defects of prevailing system of education, which he believed was based on foreign culture to the exclusion of indigenous culture, it ignored the learner heart and hand. Being a practical man Gandhi wrote that the attached far more importance to the cultural aspect of education than to the literacy. In has talk to the girls of kasturbaBalika ashram, New Delhi on 20 April 1946 he said, Culture is the foundation of your life, it should show itself in the smallest details of your conduct and personal behavior like, how you sit, how you walk, how you dress, etc. So that anybody might be able to see at glance that you are the products of this institution[6].



Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-52-June -2020

**8) Inculcate high values and virtues in future generation:**

We should not forget that a child of today is a citizen of tomorrow and aim of education should, therefore, essentially be development of the qualities of citizenship, so that the rising generation could realize its duties as well as right. It is very important that very citizen becomes self-reliant and useful and productive unit of society. According to Gandhiji basic education fulfill this aim to major extent as every child has compulsory to do some manual work and inculcate high virtues like dignity of Labour, mutual respect and trust, co-operation, independence, social service, and love for the country.

**9) Adult Education:**

In the Gandhian sense concept of adult education and literacy will have to be redefined for better results. The Objective of adult education should be to remove ignorance. According to Gandhiji, literacy is just not the ability to read and write, but the literacy of whole personality. Infect it is the literacy of whole personality that might solve our social, political, religious and economic problems. Thus in Gandhian idea, the adult education should have an aim to raise the general level of people´s life. Materially, morally, culturally and spiritually etc.

**10) Women Education:**

Gandhiji has supported that the boys and girls should be thought together, But he gave more importance to girl´s education. Because, by educating girl´s future mothers are better equipped to educate both girl´s and boy´s in the next generation. The first teacher of a child is the mother. Of course, everyone-girls and boys should get the best possible education. But, it is in the interest of the society as a whole to give special importance to women education? When girls deprived of an education, individual, family and children as well whole society in which they live, suffer. When girls are adequately educated, everyone benefits.

**11) Primary Education though Mother Tongue:**

Gandhi emphasized that Primary Education must be imparted through mother tongue, because, medium of English hindered the development of understanding and even the clarity of ideas.


Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-52-June -2020

12) **Education of non-violence:**

A unique feature of Gandhi´sEducational philosophy was the application of ideas of non-violence in the training of children. He wanted to create a generation that should live harmony and promote the ideal of non-violence.

**13) Free and Compulsory Education:**

Gandhiji visualized an India, in which each village could have the feeling of having the equal opportunities for learning. He said that seven lakh´s of villages become a well living republic in which there are no illiterates, in which all the village know and observe the law´s hygiene and sanitation. Gandhiji though that it could only be possible if government takes the responsibility to provide the free and Compulsory education.[7]

By the above discussion, it is clear that meaning of education is very wide. It is a process through which the unborn qualities of latent powers of the child are improved and unfurled, so that his overall personality is developed. Indian life and culture influenced its education as well as way of life though the ages. For instance it has been stated that:

Let all be happy and healthy

Let all be courteous and gentle and

Let nobody feel the punch of sorrow[8]

In this way education covers happiness and health, courtesy and gentiles and it tries to remove the element of sorrow and pain.

**Conclusion:**

मध्ययुगाच्या प्रारंभीच्या काळात भारताच्या विशाल प्रदेशावर भिल्लांची राज्ये होती. भिल्लांची वस्ती प्रामुख्याने विंध्याचल, सातपुडा, आणि सह्याद्रीच्या पहाडी प्रदेशात आढळून येते. यातील बराचसा भाग राजपुताना आणि गुजरातमध्येही मोडतो. आज या प्रदेशांमध्ये जेवढी आबादी आहे. त्यात सर्वात जुनी वस्ती भिल्लांची होती. राजपूत येण्याच्या फार आधी या प्रदेशात भिल्लांचे वर्चस्व होते.[१५] एके काळी भारतात भिल्लांची सामर्थ्यशाली राज्ये होती. याचे अनेक दाखले मिळतात. राजस्थानमधील जोधपूर, उदेपूर, डुंगरपूर, याठिकाणी भिल्लांची सत्ता होती. नंतर ही राज्ये राजपुतांनी जिंकून घेतली.[१६] इ.स.३९० पर्यंत माउंट अबूवर जेत्सी नावाच्या भिल्लाचे राज्य होते असे संकेत मिळतात. गुजरातचा समकालीन राजा भीमदेव दुसरा याने जेत्सीच्या कन्येशी विवाह करण्याचा प्रस्ताव मांडला परंतु या दोन राजांमध्ये शत्रुत्व असल्यामुळे जेत्सीने हा विवाहाचा प्रस्ताव नाकारला. त्यामुळे याचा राग येऊन राजा भिमदेवाने आक्रमण केले. झालेल्या लढाईत भील

राजा जेत्सीचा पराभव झाला. मेवाडमध्येही भिल्लांची राज्ये होती. मेवाडच्या आसपास प्रदेशातही भिल्लांची लहान मोठी राज्ये होती. राजा आणि प्रजा दोन्ही भील होती. सम्राट शिलादित्यच्या नेतृत्वात इ.स. ६४७ मध्ये मेवाडवर आक्रमण झाले. भिल्लांचा पराभव झाला. त्याने भील जनपद राज्याचे नाव बदलून शिव जनपद असे नामकरण केले. मध्यप्रदेशात इ.स. १३०० मध्ये शुक नावाचा भील शासक होता. त्याचे राज्य झांबुआ याठिकाणी होते. त्याचे धोलताच्या राजपूत सरदाराशी चांगले संबंध होते. परंतु तत्कालीन गुजरातच्या राजाशी परंपरागत शत्रुत्व होते. गुजरातच्या राजाने दिल्लीच्या शासकांच्या सहाय्याने शुक राजाचे राज्य जिंकून घेतले.१७

कर्नल टॉडच्या मते मेवाड, माळवा, खानदेश व गुजरात या प्रदेशात भिल्लांची वस्ती होती. मेवाडमधील लोक पूर्वी भिल्लच होते. हॅमिल्टनच्या मते दक्षिण माळव्यात भिल्ल मोठ्या प्रमाणात होते. नर्मदा खोरे असलेला निलगड भागावर विभारसी भिलोरा या भिल्ल राजाचे राज्य होते. अकराव्या शतकाच्या अखेरीस आसावल (अहमदाबाद) भिल्लांच्या ताब्यात होते.१८ गुजरातचे प्रसिद्ध इदर राज्य देखील एका भिल्ल शासकाचे होते. परंतु गोहा नावाच्या शिसोदया घराण्यातील राजपुताने ते बळकावून घेतले.[१९] टी.बी. नाईक यांनी 'The Bhils A Study' या ग्रंथात राजपूत आपली सत्ता स्थापन करण्यापूर्वी भिल्ल हेच या भूमीचे मूळनिवासी आहेत हे दर्शविण्यासाठी काही राजपूत राजे राजगादीवर बसताना भिल्ल प्रमुखाने आपला अंगठा कापून रक्ताचा टिळा त्या राजाच्या कपाळाला लावत. हीच परंपरा सातपुड्यातील राजपिपलाचे राजपूत राजांमध्ये देखील प्रचलित होती. जुना राजपिपलाचा भिल्ल प्रमुख 'वसावा' हा नव्या राजपूत राजाच्या कपाळाला रक्ताचा टिळा लावून त्याच्या सत्तेला मान्यता देत होता असे वर्णन आहे.[२०] काही ठिकाणी राजपूत आणि भिल्ल यांच्यात सलोख्याचे संबंध निर्माण झालेले दिसून येतात. त्यातूनच त्यांच्यात विवाहसंबंध देखील प्रस्थापित झाले. भिल्ल स्त्रीपासून उत्पन्न झालेला पुरुष स्वतःला राजपूत म्हणून ओळखला जाऊ लागला.[२१] भिल्ल हे लढवय्या वंशाचे होते. राजपुतानाच्या इतिहासात भिल्लांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उदयपूरच्या महाराणा प्रतापसिंगाला मुघलांविरुद्ध लढतांना हळदीघाटीच्या युद्धात, भिल्लांनी लष्करी मदत केली होती. राणा प्रतापाने सेनापती राणा पुंजा भील यांचा सन्मान करताना मेवाडच्या राजचिन्हाध्ये एकाबाजूला महाराणा प्रताप व दुसऱ्या बाजूला राणा पुंजा भीलचे चित्र अंकित केले आहे.[२२] काही ठिकाणी भिल्ल नायकांच्या मुलीशी राजपूत लग्न करीत. पुढे त्यांच्यापासून झालेल्या संततीला भिलाला असे नाव पडले. खानदेशात आणि मध्यप्रदेशात भिलाला आडनाव असलेल्या भिल्लांची संख्या बरीच आहे.[२३] काही मुस्लिम राज्यकर्त्यांनीही भिल्लांशी विवाहसंबंध जोडले आहेत. गुजरातचा शासक अहमदशाहाची पट्टाराणी एक भील सुंदरी होती. तिच्या मृत्यूनंतर अहमदाबाद येथे एक मकबरा बांधण्यात आला आहे.[२४]

यानंतर मात्र राजपूत, मुसलमान यांच्याशी भिल्लांचे मैत्रीपूर्ण संबंध जास्त काळ टिकले नाही. इ.स. १००० ते १४०० या काळात राजपुतांनी भिल्लांना राजपिपला, मांडवी आणि धरमपूर येथून हुसकावून लावले. पंधराव्या शतकात भिल्लांची वस्ती असलेला रेवाकांठा हा भाग मुसलमानांच्या ताब्यात गेला आणि सतराव्या

शतकापर्यंत या भागात मुसलमानांचा अंमल चालू राहिला. औरंगजेबाच्या कारकीर्दीत अनेक भिल्लांनी इस्लाम धर्म स्वीकारला किंवा त्यांना बाटविण्यात आले. धर्मांतरित भिल्लांना तडवी असे संबोधण्यात येऊ लागले. तडवी भिल्लांचा धर्म जरी भिन्न (मुसलमान) असला तरी आचारविचार, पोशाख व सण इतर भिल्लांसारखे असतात.[२५] सातपुड्यात गंगथा संस्थान[२६] आणि चिखलीच्या नाईक जहागिरदारांवर मुस्लीम धर्माचा प्रभाव होता. त्यांच्या वारसांची नावे मुस्लीम पद्धतीने ठेवलेली आढळून येतात. तसेच काही धार्मिक विधी मुसलमान पद्धतीने केली जात होती.[२७] असे असले तरी मुस्लीम राजवटीच्या काळात भिल्लांचे जीवन असुरक्षित होते.

**मराठा काळ**

मराठा सरकारच्या काळात देखील भिल्लांचे जीवन सुरक्षित नव्हते. पंधराव्या ते अठराव्या शतकापर्यंत स्थानिक राज्यकर्त्यांकडून भिल्लांचा खूप छळ झाला. "ज्या प्रदेशात भिल्लांनी बंडाळी उभारली होती. त्या प्रदेशातील भिल्लांना गुलामाप्रमाणे, जनावरासारखे वागवण्यात येत होते." असे मेजर हेण्ड्री यांनी लिहून ठेवले आहे. त्यामुळे ते बंड करुन उठले आणि लुटालुट करु लागले. तेव्हा राज्यकर्त्यांनी अनेक भिल्लांची क्रूरपणे हत्या केली. अनेक भिल्ल डोंगरदऱ्यांचा आश्रय घेऊन राहिले. त्यांची उपासमार होऊ लागली. त्यामुळे संधी मिळेल तेव्हा सपाटीच्या प्रदेशात येऊन लुटालुट करुन सक्तीने पैसे वसुली करणे, गुरे पळवणे, प्रवाशांना लुबाडपणे, मारझोड करणे अशी कृत्ये करु लागले. त्यांनी मध्य भारतात बंड करुन धुमाकूळ घातला होता.[२८]

मराठ्यांनी सन १७६० मध्ये उद्गीरच्या लढाईत निझामाचा पराभव करुन बऱ्हाणपूर आणि आसीरगड जिंकून घेतले. संपूर्ण खानदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. मराठ्यांनी सन १८१८ पर्यंत खानदेश प्रदेश आपल्या ताब्यात ठेवला होता.[२९] मराठ्यांची सत्ता स्थापन होण्याआधी सातपुड्यात आणि सातपुड्याच्या पायथ्याशी आदिवासी संस्थाने होती. पेशव्यांनी आपली प्रशासकीय घडी बसवताना खानदेशात ६ सरकार निर्माण केले. त्यात आशेर (आसीर), गाळणा, नजरबाद (नंदुरबार), बागलाण, बिजागड (विजयगड), व हांडिया[३०] या ६ सरकारची पुन्हा अनेक परगण्यात विभागणी केली होती. सरकार आशेर ३४ परगणे, सरकार गाळणा ७ परगणे, सरकार नंदुरबार ४ परगणे, सरकार बागलाण २६ परगणे, सरकार बिजागड ३३ परगणे आणि सरकार हांडिया १६ परगणे[३१] खानदेशात असे एकूण १२० परगणे होते. ब्रिटीश काळात खानदेशात बऱ्हाणपूरचा समावेश होत नव्हता.[३२] या सर्व परगण्यांमध्ये भिल्लांची कमी अधिक प्रमाणात वस्ती होती. दरम्यानच्या काळात पेशवे-होळकर संघर्षाला सुरुवात झाली. पेशवे व होळकर संघर्षात पेशव्यांनी होळकरांनी नाकेबंदी करण्यासाठी यशवंतरावाचा खानदेशातील प्रदेश खालसा केला. त्याच वेळी दुसऱ्या बाजीरावाने भिल्लांना दिलेली वतने काढून घेतली. त्यामुळे या भिल्ल प्रमुखांचा उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला. म्हणूनच पेशवे इंग्रज संघर्षात भिल्लांनी कोणाचीच बाजू घेतली नाही.[३३] उलट त्यांनी सर्वत्र लुटालूटीचे आणि विध्वंसक कारवाया सुरु केल्या होत्या. ब्रिटीश विरुद्धही आदिवासींनी मोठे बंड केले. सन १८५७ च्या उठावानंतर सातपुड्यात शांतता प्रस्थापित करण्यात ब्रिटिशांना यश आले. शरण आलेल्या भिल्लांना माफी दिली. शेतीसाठी

तगाई कर्जे दिली. कसण्यासाठी जमीन दिली.[३४] त्यामुळे भिल्ल समाज शेतीकडे वळला. रोजगारासाठी डोंगर दऱ्यातून बाहेर पडू लागला. यानंतर उपजीविकेसाठी अनेक ठिकाणी स्थलांतरित झाला.

खानदेशात तीन गटांत भिल्ल आदिवासींची विभागणी झालेली आहे. १) सपाट प्रदेशात राहणारे भिल २) डोंगराळ प्रदेशात राहणारे भिल्ल. ३) अन्यत्र राहणारे मिश्र भिल्ल. सपाट प्रदेशात राहणाऱ्या भिल्लांना फक्त भिल्लच म्हणतात. डोंगराळ भागात राहणारे व मिश्र भिल्लांपेक्षा ते सुधारलेले आहेत. डोंगराळ भिल्लांमध्ये बरडा, धानका, ढोरपी, गावीत, खोतील, मथवाडी, मावची, पावरा, नहाल, डांगची आणि वारली यांचा समावेश होतो. पावरा हे भिल्लांपेक्षा वेगळे असून ते स्वत:ला भिल्ल म्हणवून घेत नाहीत. मिश्र भिल्लांमध्ये भिलाला, तडवी, निरढे नहाल या पोटभेदाचा समावेश होतो. मिश्र जातीतील भिलाला ही भिल्ल व राजपूत किंवा कुणबी यांची मिश्र जात असून ती रावेर तालुक्यात आढळते. तडवी हे भिल्ल व मुसलमान यांचे मिश्रण असून सातपुड्याच्या पूर्वेला आढळतात. निरढे व नहाल हे देखील भिल्ल व मुसलमान आहेत.[३५] असे असले तरी या धर्मांतरित झालेल्या भिल्लांनी आपली मूळ संस्कृती सोडलेली नाही.

**सांराश**

'सातपुडा प्रदेश' प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. त्यात गुजरात, राजस्थान आणि मध्यप्रजदेशातील पर्वत रांगा, विंध्य आणि अरवली पर्वताचा भाग, महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, अमरावती आणि औरंगाबाद जिल्ह्यातील सातपुडा आणि अजिंठा पर्वत रांगांचा समावेश होतो. प्राचीन साहित्यात भिल्लांची माहिती मिळते. त्यांचा उल्लेख 'रामायण' आणि 'महाभारत' या प्राचीन ग्रंथात अनेक ठिकाणी येतो. रामाला भक्तीभावाने बोरे खाऊ घालणारी शबरी, रामायण लिहणारा वाल्मिकी (वाल्या कोळी), महाभारतातील सर्वश्रेष्ठ धनुरधारी एकलव्य हे सर्व भिल्लच होते. मध्ययुगाच्या प्रारंभीच्या काळात भारताच्या विशाल प्रदेशावर भिल्लांची राज्ये होती. भिल्लांची वस्ती प्रामुख्याने विंध्याचल, सातपुडा, आणि सह्याद्रीच्या पहाडी प्रदेशात आढळून येते. यातील बराचसा भाग राजपुताना आणि गुजरातमध्येही मोडतो. आज या प्रदेशांमध्ये जेवढी आबादी आहे. त्यात सर्वात जुनी वस्ती भिल्लांची होती. राजपूत येण्याच्या फार आधी या प्रदेशात भिल्लांचे वर्चस्व होते. भिल्ल हे लढवय्या वंशाचे होते. राजपुतानाच्या इतिहासात भिल्लांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उदयपूरच्या महाराणा प्रतापसिंगाला मुघलांविरुद्ध लढतांना हळदीघाटीच्या युद्धात, भिल्लांनी लष्करी मदत केली होती. राणा प्रतापाने सेनापती राणा पुंजा भील यांचा सन्मान करताना मेवाडच्या राजचिन्हाध्ये एकाबाजूला महाराणा प्रताप व दुसऱ्या बाजूला राणा पुंजा भीलचे चित्र अंकित केले आहे.सातपुडा परिसरात आदिवासींचे अनेक संस्थान होते. त्यांनी इंग्रजांविरुध्द अनेक उठावात भाग घेतलेला दिसून येतो.

**संदर्भ सूची**

१. गारे (डॉ.) गोविंद - सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा, पूर्वोक्त पृ.क्र.५,६.
२. इंन्थोव्हेन आर.ई. - द ट्राइब्ज अॅण्ड कास्ट ऑफ बॉम्बे - खंड १, कसमो पब्लिकेशन, दिल्ली, १९७५. पृ.क्र.१५१-१५२.

३. सेशड्युल ट्राइब्ज इन महाराष्ट्र - सेन्स्स ऑफ इंडिया १९६१, खंड १०, भाग व्हि-बी इन्थोंग्राफीक नोटस्, १९७२. पृ.१३३.

४. माथूर एल. पी. - रेझिस्टन्स मोव्हमेंट ऑफ ट्राइबल ऑफ इंडिया - हिमांशू पब्लिकेशन, १९९८, उदेपूर, पृ.क्र.७.

५. भील देवीलाल - भारत के मूल आदिम मानव भील - एकलव्य आदिवासी प्रकाशन जोधपूर (राजस्थान), प्रथम संस्करण, २०००, पृ.क्र.१३.

६. नायडू पी. आर. - भारत के आदिवासी विकास की समस्याएँ, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, प्र.संस्करण १९९७, द्वि. संस्करण २००२, पृ.क्र.५७.

७. इन्थोव्हेन आर.ई. - पूर्वोक्त, १५२.

८. नाईक टी.बी. - द भिल्स अ स्टडी, भारतीय आदिम जाती सेवक संघ, किंग्जवे, दिल्ली पब्लिकेशन, १९५६, पृ.क्र.१५.

९. स्थानिक लोक कथेनुसार

१०. शर्मा (डॉ.) सी.एल. - भील समाज कला एवं संस्कृति, मालती प्रकाशन, विराट नगर, जयपूर (राजस्थान) २५ अगस्त, १९९८, पृ.क्र.१३.

११. जळगाव जिल्हा गॅझेटीयर - पूर्वोक्त पृ.क्र.२०३-२०४.

१२. माथूर एल.पी. - पूर्वोक्त, पृ.क्र.८.

१३. सेशडयुल ट्राइब्ज इन महाराष्ट्र - पूर्वोक्त, पृ.क्र.१३३.

१४. नाईक टी.बी. - पूर्वोक्त, पृ.क्र.१८.

१५. डॉ. खलील अब्बास सिद्दीकी - अनुवादक - श्रीवास्तव (डॉ) नारायण प्रसाद - भारत के आदिवासी - प्रकाशन, भारतीय मानव विज्ञान सर्वेक्षण शिक्षा एवं संस्कृती मंत्रालय, भारत सरकार, कलकत्ता पृ.क्र.८०.

१६. इन्थोव्हेन आर.ई. - पूर्वोक्त, पृ.क्र.१५३.

१७. शर्मा (डॉ.) सी.एल. - पूर्वोक्त, पृ.क्र.५०-५१.

१८. जळगाव जिल्हा गॅझेटीयर - पूर्वोक्त, पृ.क्र.२०४.

१९. जैन श्री चन्द्र - वनवासी भील और उनकी संस्कृती - प्रकाशक, रोशनलाल जैन ॲण्ड सन्स, जयपूर, प्र.संस्करण १९७३, द्वि.संस्करण १९७४, पृ.क्र.२.

२०. इन्थोव्हेन आर.ई. - पूर्वोक्त, पृ.क्र.१८.

२१. डॉ. खलील अब्बास सिद्दीकी - पूर्वोक्त, पृ.क्र.८१.

२२. वर्मा आर.सी. - भारतीय जमाती काल, आज आणि उद्या - पूर्वोक्त, पृ.क्र.२३.

२३. जळगाव जिल्हा गॅझेटीयर - पूर्वोक्त, पृ.क्र.२०४.

२४. डॉ. खलील अब्बास सिद्दीकी - पूर्वोक्त, पृ.क्र.८१.

२५. जळगाव जिल्हा गॅझेटीयर - पूर्वोक्त, २०४.

२६. गारे (डॉ) गोविंद - सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा - पूर्वोक्त, पृ.क्र.१३१.

२७. चिखली दप्तर - न्यायालयीन कागदपत्रे, पृ.क्र.१०६.

२८. गारे (डॉ) गोविंद - सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा - पूर्वोक्त, पृ.क्र.१००.

२९. शहा जी.बी. - पेशवे कालीन खानदेश, पहा जगताप पी.डी. (संपा) खानदेश जळगांव १९९७, पृ.क्र.६९.

३०. उपरोक्त

३१. पुणे पुराभिलेखागार, शाहू दप्तर, माल नं १३, पुडके १.

३२. पुणे पुराभिलेखागार, प्री १८५७, पश्चिम खानदेश, माल नं. ६ फाईल - ७९७

३३. देशपांडे ए.एम. - जॉन ब्रिग्ज इन महाराष्ट्र - मित्तल प्रकाशन, दिल्ली, प्र.आ. १९८७, पृ.क्र.७०.

३४. गारे (डॉ) - सातपुडयातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा - पूर्वोक्त, पृ.क्र.१०९.

३५. जळगाव जिल्हा गॅझेटीयर - पूर्वोक्त, पृ.क्र.२०५.

# 3.3.2.1 Research Paper Published in Peer Reviewed and Referred Journals

17

# इतिहास संशोधन पध्दती

प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा
इतिहास विभाग प्रमुख,
विद्या विकास मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय
अक्कलकुवा, जि. नंदुरबार

**प्रस्तावनाः**

सामाजिक विज्ञानाच्या संशोधन पध्दतीपेक्षा इतिहासातील संशोधन पध्दती वेगळी आहे. प्रायोगिक संशोधन पध्दतीमध्ये निरीक्षणे वांरवार पाहिजे तितकी घेता येतात. परंतु इतिहासातील घटनांची पुनरावृत्ती करता येत नाही. ऐतिहासिक काळात जी घटना घडून गेलेली असते ती पुन्हा घडत नाही. इतिहासकार डॉ.चंद्रा व डॉ.वर्मा यांनी असे म्हटले आहे की, ?ऐतिहासिक संशोधन हे प्रयोगावर आधारित नसून ते निरीक्षणाच्या अहवालावर आधारित असते. आणि ज्याची पुनरावृत्त होऊ शकत नाही.? (Historical Research is not based upon experimentation but upon reports of observation which cannot be repeated१ ) ऐतिहासिक घटना घडून बराच कालावधी लोटल्यानंतर त्या घटनेचा शोध घेणे अवघड व क्लिस्ट असते. म्हणून त्याकरिता संशोधनासाठी उपयोगात आणावयाची साधनेसुध्दा वेगळी असतात. इतिहासाच्या भिन्न स्वरुपामुळे, इतर सामाजिक विज्ञान आणि इतिहासात काही बाबतीत फरक असतो. असे असले तरी सर्वसामान्य वैज्ञानिक पध्दती ऐतिहासिक संशोधनात देखील वापरता येते. ऐतिहासिक घटनांचे अध्ययन वैज्ञानिक पध्दतीने केले जाते. त्यालाच ऐतिहासिक संशोधन असे म्हटले जाते. ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**इतिहास संशोधन पध्दती (Research Methodology in History)**

**१. संशोधन समस्येची निवड (Selection of the Research Problem):**

संशोधन करतांना किंवा सर्वेक्षणाच्या प्रक्रियेमध्ये सर्वप्रथम संशोधन समस्येची निवड करावी लागते. समस्येची निवड करणे सहज आणि सोपे काम नाही. समस्येची निवड करतांना हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, त्या समस्येचे ऐतिहसिक विश्लेषण होऊ शकते का? तसेच समस्या अशा प्रकारची असावी की, त्याचे वर्तमानाशी संबधित अध्ययन केले जाऊ शकेल किंवा केवळ ऐतिहासिक अध्ययन शक्य होऊ शकेल. संशोधन समस्या किंवा विषय असा निवडला पाहिजे की, ज्याचे अध्ययन ऐतिहासिक संशोधन पध्दतीने करता येईल. उपलब्ध साहित्य, अध्ययन, आपली योग्यता, दुरदर्शिता, अंतर्दृष्टीच्या सहाय्यानें संशोधनकर्ता आपल्या संशोधन विषयाची निवड करतो.

संशोधन विषयाची निवड करतांना संशोधकाने आपल्या आवडीचा विषय निवडणे महत्वाचे असते. त्या विषयात त्याला रुची असणे आवश्यक आहे तरच विषयाची निवड करावी. संशोधकाला त्या विषयात पुर्वज्ञान असणे गरजेचे असते. जर विषय अवघड असेल तर संशोधनकार्य करण्यास अडचनी येतात. अनेकदा संशोधनकार्य अपूर्णच राहते. पैसा आणि श्रम वाया जातो. तसेच संशोधन विषयाची मर्यादा ठरवावी. त्याने त्याच विषयावर फोकस केला पाहिजे. त्याचबरोबर संशोधनकर्त्याने आपण निवडलेल्या विषयाचे महत्व काय आहे त्याला सामाजिक व ऐतिहासिक महत्व कसे राहिल हे संशोधनकर्त्याने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. तसेच संशोधनासाठी पैसा जास्त खर्च होतो. हे संशोधनकर्त्याने लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार करुनच संशोधनकर्त्याने आपल्या विषयाची निवड करावी.

**२. गृहितकृत्याची निर्मिती (Formulation of Hypothesis) :**

ऐतिहासिक संशोधनात गृहितकृत्ये हे फार महत्वाचे आहेत. ऐतिहासिक काळातील घटना, परिस्थिती इत्यादींचे प्रश्नाच्या स्वरुपात विश्लेषण करण्यासाठी गृहितकृत्ये उपयुक्त असतात. संशोधनकर्त्याला भूतकालीन घटनांची सप्रमाणता आणि विश्वसनीयता तपासून त्यांची कालक्रमानूसार मांडणी करावी लागते. म्हणून अशा संशोधनांमध्ये संशोधक कोणतेही गृहितकृत्ये मांडू शकत नाही. परंतू गृहितकृत्ये नसलेल्या अध्ययनाचे निष्कर्ष निघू शकत नाही व विश्लेषणही करता येत नाही. ऐतिहासिक संशोधनाकरिता गृहितकृत्य हे औपचारिक आणि ज्यांचे परिक्षण होऊ शकेल असे असू शकत नाही. ते स्पष्ट विधानाच्या स्वरुपात लिहिलेले असते. आणि ते घटनेचा वृत्तांत आणि परिस्थितीचा अंदाज स्पष्ट करु शकते.

वॅन डालेन यांच्या मते स्पष्ट विधान किंवा गृहितकृत्यांची

पध्दतशीर जागृतता ही तथ्ये महत्पुर्ण आहेत काय याचे निर्धारण करणे, संशोधकर्त्याच्या कल्पना आणि तथ्यांमधील संबंध स्पष्ट करणे यासाठी उपयोगी असतात. तसेच त्यामुळे अनावश्यक, पक्षपाती, चुकीची किंवा जुने गृहितकृत्य मांडण्याची शक्यता कमी केली जाते. (An explicit statement, or a systematic awareness of the Hypothesis used in determining what facts were significant, clarifies the relationship between the investigators ideas and the facts be reports, and if minimizes the possibility of employing trivial, biased, conflicting, or archaic Hypothesis.२)

गृहितकृत्ये मांडतांना संशोधक प्रश्नांची निर्मिती करु शकतो, जी ऐतिहासिक घटनांचा शोध घेण्यासाठी अधिक उपयुक्त असतात. त्या प्रश्नांची उत्तरे पुरावा किंवा प्रमानाच्या आधारावर मिळविण्याच्या दृष्टीने संशोधक आपले संशोधन कार्य करु शकतो.

**३. तथ्यांचे संकलन (Collection of Data) :**

संशोधन विषयाची निवड आणि संशोधनाच्या संदर्भात स्पष्ट विधाने मांडल्यानंतर तथ्यांचे संकलन केले जाते. ऐतिहासिक तथ्यांचे संकलन करणे कठीण असते. म्हणून तथ्यांचे संकलन करतांना अत्यंत सतर्कता बाळगली पाहिजे. ऐतिहासिक तथ्यांचे प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन प्रकारची साधने आहेत. या दोन प्रकारच्या साधनांद्वारे ऐतिहासिक तथ्यांचे संकलन केले जाते.

**अ) प्राथमिक साधने (Primary Sources):**

ऐतिहासिक घटना घडत असतांना प्रत्यक्ष साक्षीदार असलेल्या व्यक्तीने लिहून ठेवलेल्या, निर्माण केलेल्या किंवा तसल्यास इतर प्रकारच्या साधनांना प्राथमिक साधने असे म्हणतात. प्रत्यक्ष डोळयांनी साक्ष असलेले विवरण हे ऐतिहासिक चौकशीचे ठोस आधार असते. संशोधक गुड, बार आणि स्केटस यांनी त्यास तथ्यांचा पहिला साक्षीदार (First Witnesses to a Fact३) असे संबोधले आहे. अवशेष किंवा मुळ रेकॉर्डस यांचा समावेश प्राथमिक साधनांमध्ये केला जातो. ते लिखित, चित्रमय, मौखिक प्रमाण, तांत्रिक रेकॉर्डस इत्यादी स्वरुपामध्ये असतो.

ऐतिहासिक प्राथमिक साधने पुढीलप्रमाणे :

१) उत्खनन
२) पुराणवस्तू
३) नाणी
४) शिलालेख
५) ताम्रपट
६) चित्र
७) नकाशे
८) स्थापत्य मंदिर
९) किल्ले, महल
१०) भौतिक अवशेष
११) समकालीन कागदपत्रे
१२) गुप्त पत्रव्यवहार
१३) जमाखर्च नोंदी
१४) प्रश्नावली
१५) धार्मिक सनदा
१६) वत्तपत्रे
१७) आत्मचरित्रे व आठवणी
१८) राजकिय तह व करार
१९) रोजनिशी
२०) राज्यकारभाराची पत्रे
२१) खाजगी पत्रे

वरील साधने ही प्राथमिक साधनांमध्ये समाविष्ट केलेली आहेत. ऐतिहासिक संशोधनासाठी ही साधने अतिशय उपयुक्त आहेत. ज्यावेळी घटना घडत असते, ती घटना एखाद्या व्यक्तीने स्वत:च्या डोळयांनी पाहिलेली असते, ती साधने म्हणजेच प्राथमिक साधने होय.

**ब) दुय्यम साधने (Secondary Sources) :**

घटना घडून गेल्यानंतर त्या घटनेविषयी कुणाला तरी माहिती कळते, कुणाकडून ती माहिती ऐकली जाते. ती नोंदवली जाते. किंवा व्यक्तीने घटना, वस्तू किंवा परिस्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण न करता अहवालाद्वारे पुरविलेली माहिती म्हणजेच दुय्यम साधने होय. यामध्ये संशोधक प्रत्यक्ष साक्षीदार किंवा निरिक्षण करणाऱ्या व्यक्तीशी प्रत्यक्ष संपर्क साधून किंवा साक्षीदाराने लिहून ठेवलेली माहिती वाचून तथ्ये गोळा करतो. म्हणून अशा प्रकारच्या तथ्यास दुय्यम साधने असे म्हणतात. दुय्यम साधनाद्वारे मिळवलेली माहिती किंवा तथ्ये विश्वसनीय, खरे नसतात. घटनेत सहभागी असणाऱ्या व्यक्तीच्या अहवालात देखील मतभेद आढळून येतात. अशावेळी घटनेला साक्षीदार नसणाऱ्या व्यक्तीकडून ऐकीव माहितीच्या आधारे दिलेल्या तपशिलात सत्यता असेलच, असे निश्चित सांगता येत नाही. म्हणून दुय्यम साधने किंवा साधनांचा उपयोग संशोधकर्त्याने अधिक विचारपूर्वक करण्याची आवश्यकता असते. दुसऱ्यांनी लिहिलेले अहवाल, पुस्तके इत्यादींचा दुय्यम साधनात समावेश होतो. संशोधनाचा प्रारंभ हा अशा प्रकारच्या दुय्यम साधनांच्या

आधारे होत असला तरी शेवटी संशोधकाला प्राथमिक साधनांद्वारे तथ्यांचे संकलन करुन सत्याचा शोध घ्यावा लागतो.

**ऐतिहासिक दुय्यम साधने पुढीलप्रमाणे :**

बखरी, वंशावळी, कुळवटी, महजर, करीने, शकावल्या, वाङ:मय, दंतकथा, पोथ्या, खंडकाव्य, आत्मचरित्रे, चरित्रे, बाडे (भाड) काव्य, साहित्य, म्हणी, दंतकथा, पोवाडे, इंटरनेट, इत्यादी.

एखादी घटना घडत असतांना ती प्रत्यक्ष पाहिलेली नसते. परंतू त्यानंतरच्या काळात किंवा केंव्हातरी लिहिलेली असते. ते साधन दुय्यम साधन होय.

अशाप्रकारे संशोधनकर्ता प्राथमिक आणि दुय्यम साधनांद्वारे तथ्याचे संकलन करतो. संशोधनकर्त्याला पुर्णपणे दुय्यम साधनांवर अवलंबून राहता येत नाही. दुय्यम साधनांद्वारे मिळविलेल्या दुय्यम तथ्यांच्या सत्यतेची शहानिशा अतिशय काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. तसेच प्राथमिक साधनांद्वारे प्राप्त केलेली माहिती ही पुर्णपणे खरी आहे का? असा प्रश्न स्वत: संशोधकर्त्याने उपस्थित करुन प्राथमिक तथ्यांची देखील वस्तूनिष्ठपणे तपासनी केली पाहिजे. जर ती तथ्ये वस्तूनिष्ठतेच्या कसोटीवर उतरत असेल तर ती सत्यता आणि प्रमाणित मानली पाहिजे.

**४. तथ्यांची मीमांसा (Criticism of Data):**

ऐतिहासिक संशोधनात प्रत्यक्ष निरीक्षणाची संधी प्राप्त होत नाही. तर त्या घटना कितीतरी वर्षापूर्वी घडून गेलेल्या असतात. ऐतिहासिक घटनांची पुनरावृत्ती करणे शक्य नाही. म्हणून घडून गेलेल्या घटनांची सत्यता आणि महत्वपुर्ण माहिती विविध साधनांच्या आधारे प्राप्त करावी लागते. तथ्य संकलन ज्या साधनांद्वारे करण्यात आले त्या साधनांच्या वैधतेवरच संकलित तथ्यांची वैधता अंवलंबून असते. म्हणून ज्या साधनांद्वारे तथ्ये संकलित करण्यात आली. त्या साधनांची वैधता तपासून घेतली पाहिजे. ज्या पुराव्यांच्या आधारे सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला असतो. ते पुरावे देखील काळजीपुर्वक तपासले पाहिजे. तसेच संकलित करण्यात आलेल्या तथ्यांची सुद्धा काळजीपूर्वक पडताळणी करणे अनिवार्य असते. कारण संकलित तथ्ये दोषपुर्ण असतील तर त्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष देखील चूकीचे राहतील. म्हणून संकलित माहिती किंवा तथ्याची मीमांसा केली पाहिजे. तथ्यांची मीमांसा केल्यानंतरच त्याचा ऐतिहासिक पुरावा म्हणून उपयोग करणेयोग्य असते. प्राप्त माहिती किंवा तथ्यांची मीमांसा ही दोन प्रकारे केली जाते.

**अ) बाहय मीमांसा किंवा बहिर्गत परीक्षण (External Criticism) :**

संशोधनकर्त्याने संकलित केलेली माहिती किंवा तथ्यांची विश्वसनियता निश्चित करण्याच्या प्रक्रियेला बाहय मीमांसा असे म्हणतात. बाहय मीमांसाला प्रतीची मीमांसा (Lower Criticism) म्हणतात. बाहय मीमांसेद्वारे ज्या स्त्रोताद्वारे तथ्याचे संकलन करण्यात आले त्या स्त्रोताच्या सत्यता आणि विश्वनियतेची तपासनी केली जाते. मौली यांच्यामते ?बाहय मीमांसेचा हेतू हा खूप नकारात्मक नसून ऐतिहासिक सत्याची स्थापना करणे हा आहे.? (The Purpose of external Criticism is not so much negative as it the establishment of Historical teuth४.)

ऐतिहासिक तथ्यांची यथार्थता निंश्चित करण्यासाठी संशोधनाजवळ भरपूर ऐतिहासिक आणि सामान्य ज्ञान असले पाहिजे. याबद्दल आपले विचार मांडतांना वॅन डालेन यांनी म्हटले आहे की, संशोधकाजवळ चांगल्या प्रकारच्या कालक्रमाचे ज्ञान, चपळ बुंध्दी, चांगली विवेक बुध्दी, मानवी वर्तनास समजून घेण्याची बुध्दीमत्ता आणि चांगली भरपूर प्रमानात सहनशीलता आणि दृढता असली पाहिजे.? (The Researcher also need a good chronological sense, a versatile intellect, good common sense, an understanding of human behavior, and good plenty of patience and persistence.५)

अभिलेखाचा लेखक आणि काळ निश्चित करतांना स्वाक्षरी, हस्ताक्षर, लिपी, शुध्दलेखन, भाषा, शैली इत्यादीच्या आधारे निर्णय घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे शाई, रंग, कागद, शिला, वस्त्र, धातू, लाकूड इत्यादी गोष्टीचे भौतिक आणि रासायनिक परीक्षण करावे लागते. व्यक्ती, संस्था इत्यादी बाबतीत मिळनारी माहिती त्या विंशिष्ट कालखंडातील माहितीशी कितपत जुळते ते पाहणे आवश्यक आहे. बाहय मीमांसेमुळे प्राप्त माहितीमधील फसवेपणा दूर होतो. परंतु या मीमांसेचा मुख्य हेतू ती माहिती कितपत अधिकृत आहे, याचा तपास करणे हा आहे.

**ब) आंतरिक मीमांसा किंवा अंतर्गत परीक्षण (Internal Criticism) :**

संकलित कलेली माहिती किंवा तथ्यांच्या वैधतेचे मूल्यांकन करण्याच्या प्रक्रियेला आंतरिक मीमांसा किंवा अंतर्गत परीक्षण असे म्हणतात. प्राप्त माहिती किंवा तथ्ये ही अधिकृत असून देखील वैध नसण्याची शक्याता असते. प्राप्त माहिती व तथ्याची अचूकता व गुणवत्ता तपासणे हा आंतरीक परीक्षणेचा

हेतू आहे. अनेकदा मूळ लेखात अनेक प्रकारचे बदल घडून येत असतात उदा. शब्दात बदल करणे, काही माहिती त्यातून काढून टाकणे, नवीन माहितीची भर घालणे, मूळ लेखातील क्रम बदलणे इत्यादी प्रकारचे बदल घडू शकतात. कधी कधी मूळप्रत जीर्ण झाल्यामुळे पुढील काळात नवीन प्रत तयार केली जाते. ज्यावेळी मूळप्रतीमध्ये बदल घडून येतो. मूळप्रतीतील अक्षर ओळखता न येणे, त्यातील काही भाग नष्ट होणे किंवा पुसट होणे यामुळे देखील मुळप्रतीत बदल होत गेल्यामुळे शेवटची प्रत पहिल्या मुळ प्रतीहून अगदी भिन्न असण्याची शक्यता असते. म्हणून लेखातील मूळ भाग कोणता याची काळजीपूर्वक मीमांसा करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक तथ्यांची बाहय व आंतरिक मीमांसा करण्याच्या प्रक्रियेत संशोधकाला उपयोगी असणाऱ्या प्रश्नांची सूची गुड, बार आणि स्केटस यांनी दिली आहे.६ ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) लेखक कोण होता? यामध्ये केवळ त्याचे नावच नाही तर त्याचे व्यक्तीमत्व, चारित्र्य, स्थान इत्यादी कसे होते.

२) एक वार्ताहर किंवा वृत्तांत निवेदक म्हणून त्याची सामान्य पात्रता, चपळता, चारित्र्य, पक्षपात इत्यादी कशी होती.

३) एक वार्ताहर किंवा वृत्तांत निवेदक म्हणून त्याची पात्रता आणि अपात्रता कोणती होती?

अ) घटनांच्या संबधात त्याला रुची होती काय?

ब) घटनांच्या निरीक्षणासाठी त्याने कशा प्रकारचा संबध प्रस्थापित केला?

क) घटनांच्या वृत्तांतासाठी आणि शिकण्यासाठी त्याच्याजवळ आवश्यक सामान्य आणि तांत्रिक ज्ञान होते काय?

४) घटनेनंतर किती लवकत त्याने त्यांचा वृत्तांत लिहिला?

५) स्मृतीच्या आधारे इतरांशी परामर्श घेतल्यानंतर, तथ्यांची सत्यता प्रमाणित केल्यानंतर किंवा सरुवातीच्या परीक्षा घेतलेल्या ड्राप्टचे एकत्रीकरण करुन प्रलेख लिहिला आहे काय?

६) हा प्रलेख इतर प्रलेखांशी कसा संबधीत आहे?

संशोधकाला वरील सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाल्यानंतर त्याला पुराव्यावर अशत: अवलंबून राहावे लागते. पुढे फार परिक्षण करण्याची आवश्यकता नाही. अशावेळी त्याला माहितीमधील दरी भरुन काढण्यासाठी तांत्रिक निगमनाच्या अनुमानावर अवलंबून राहावे लागते.

**५) तथ्यांचे निर्वचन (Interpretation of Data):**

तथ्यांचे संकलन आणि मीमांसा केल्यानंतर अध्ययन समस्येच्या अनुषंगाने तथ्यांचे निर्वचन करावे लागते. तथ्यांचे निर्वचन कार्य अतिशय गुंतागुंतीचे बनते आणि ऐतिहासिक तथ्यांच्या अद्वितीय किंवा वेगळया स्वरुपाचे विशेष महत्व प्राप्त होते. त्यामुळे संशोधकाजवळ विशेष कौशल्य आणि कल्पनाशक्ती असणे आवश्यक असते. ऐतिहासिक स्वरूपाच्या संशोधनामध्ये संशोधकाला कारणे आणि परिणामांचे विवेचन करतांना अतिशय सावधगिरी बाळगावी लागते. कारण त्याचे स्थान नैसर्गिक किंवा भौतिक विज्ञानाच्या संशोधकापेक्षा पुर्णत: वेगळे असते. भौतिक विज्ञानाचा संशोधक हा प्रयोगशाळेत एकटा बसून प्रयोग करीत असतो. तो प्रयोगशाळेत प्रयोग करुन आपले निष्कर्ष मांडतो. परंतू ऐतिहासिक संशोधन करणाऱ्या संशोधकाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. ऐतिहासिक कारणे ही अचल आणि गुंतागुतीची असतात. ऐतिहासिक संशोधकाला अशी तथ्ये स्विकारावी लागतात की जी केसेसची कारणे आणि परिणामांशी स्पष्टपणे संबधीत नाही. म्हणून मौली यांनी नमूद केले आहे की, ?कारणत्व ही विज्ञानातील त्रासदायक संकल्पना आहे. ऐतिहासिक संशोधनांमध्ये तर ती दुप्पट त्रासदायक आहे. कारण त्यांमध्ये कारणे ही नियंत्रित वैज्ञानिक चेतनेऐवजी ऐतिहासिक स्वरुपाची किंवा आधिच निर्माण झालेल्या घटकाच्या स्वरुपात असतात.? (Causation is a troublesome concept in science it is doubly so in historical research where causes are in the nature of antecedents or precipitating factors, rather than causes in restricted scientific sense७)

**६.संशोधन अहवाल लेखन (Writing of ths Research Report):**

संशोधनातील तथ्यांचे निर्वचन केल्यानंतर त्या संशोधनाचा अतिशय व्यवस्थित आणि क्रमबध्द अहवाल लिहिणे आवश्यक आहे. संशोधनाच्या अहवालामध्ये समस्याकथन किंवा समस्याचे विधान, संबधित साहित्याचे समालोचन, संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहितकृत्ये, सर्व्हे आणि तथ्यांचा स्त्रोत, तथ्य संकलन करण्याची पद्धत, तथ्यांचे वर्गीकरण, तथ्यांचा क्रम, मीमांसा, तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन, निष्कर्ष आणि संदर्भ ग्रंथसूची या सर्व गोष्टींचा समावेश करणे आवश्यक आहे. संशोधन अहवालाचे लेखन करण्यासाठी संशोधकाजवळ उच्च प्रकारची विद्वता असली पाहिजे. हे विश्लेषणात्मक कौशल्याचे काम आहे. म्हणून कल्पकता आणि प्रतिभेच्या गुणवत्ता व्यतिरीक्त सर्जनशिलता आवश्यक आहे. संशोधन अहवाल लिहिण्याच्या शैलीमध्ये संशोधक हा वस्तूनिष्ठ असला पाहिजे. खंडित आणि अपूर्ण स्वरुपाच्या ऐतिहासिक तथ्यांच्या आधारावर प्रमाणित सामान्यीकरण प्रस्थापित केले जाते. म्हणून सामान्यपणे हे मान्य करण्यात आले की, संशोधकाला

ऐतिहासिक संशोधन अहवाल लिहितांना विषयनिष्ठ निर्वचन करण्याचे थोडे फार स्वातंत्र्य दिले पाहिजे. संशोधन अहवाल लिहितांना खात्री करुन घेतली पाहिजे की, संशोधन अहवाल पुरेसा व्यवस्थित आणि सत्यतेला कोणता बाधा आणणारा नाही.

अनेकदा ऐतिहासिक तथ्यांमधील पोकळीमुळे निर्वचन हे निरर्थक आणि असुरक्षित होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत संशोधकाने त्या तथ्यांमधील पोकळी स्पष्टपणे दर्शवावी आणि त्याने तेथेच थांबावे. असे असले तरी संशोधक पर्यायी विश्लेषण सुचवू शकतो. ऐतिहासिक संशोधनाचा अहवाल हा रुक्ष आणि आकर्षक नसलेला, शोभेचा आणि अलंकारिक नसावा. संशोधन अहवाल लक्षनाच्या शैलीतध्ये सत्यता, नियमितता, स्पष्टता आणि महत्वता असली पाहिजे८.

**७. निष्कर्ष :**

ऐतिहासिक संशोधन करत असतांना संशोधकाने संशोधनाच्या पायऱ्या (Steps of Histological Research) नूसार संशोधन करणे गरजेचे असते. संशोधनाचे विविघ टप्पे आहेत त्यामध्ये संशोधकाने सोपा, स्वत:ला समजेल रुचेल पचेल असा विषय निवडावा तसेच संबधीत विषयात संशोधन झाले नसावे. ते पडताळून पाहणे. संशोधनाची रुपरेषा तयार करतांना गृहितकृत्ये निश्चित करावेत त्यावरच संशोधनाचे विश्लेषन व निष्कर्ष तयार केला जातो. संशोधन करत असतांना प्राथमिक साधनांचा वापर करावा. तरच संशोधन दर्जेदार असते. संशोधनांचे जे साधने गोळा केलेत त्यांचे बाहय व आंतरिक परिक्षण करणे महत्वाचे असते आपल्या विषयाशी संबधीत साधने निश्चित करणे. त्यानंतर संशोधन अहवाल लेखन करण्यास सुरुवात करावी. ठरावीक ठिकाणी तळटिपा देण्याचे करावे. संशोधनाच्या शेवटी संदर्भ ग्रंथ सूची देण्याचे करावे

**८.संदर्भ ग्रंथ सूची :**

१) Soti shivendra Chandra and Rajendra k. Sharma, - Research in Education Atlantic Publishers and Distributors, New Delhi, १९९७, P.N..३४३.

२) Van Dalen, D.B.- Understanding Education Research, १९७३, P.N.७७.

३) Good, Barr, and Scaters, - Methodology of Educational Research, - Appleton Century, Crofts, Inc., १९३५, P.N.२५३.

४) Mouly G.J. - The Science of Educational Research,- Van Nostrand Ringhart Company, १९७०, P.N.२७०.

५) Van Dalen, Op. cit., P.N.२७०.

६) Good, Barr, and Scates, Op., cit.,P.N. २५९.

७) Mouly G.J, Op. cit., P.N.२१४.

८) John W. Best and James V. Khan - Research in Education , Prentice Hall of India, Private Limited, New Delhi, १९८९, P.N. ७२ & ७३.

❑❑❑

Journal of Research & Development Vol. 10 (Issue 6) April 2020, (ISSN-2230-9578)
COSMOS IMPACT FACTOR - 5.13

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रे व ग्रंथ संपादनाविषयी योगदान

प्रा.डॉ. नानाजी दगा भामरे, इतिहास विभाग
विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि. नंदुरबार

## • प्रस्तावना :-

अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला मोठा कलंक असून अस्पृश्य व्यक्तीला माणूस म्हणून असलेले समतेचे अधिकारही नाकारले होते. चातुर्वण्य-व्यवस्थेने निर्माण केलेल्या या सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवनातील गुलामगिरीचे जोखड सहण करीत शतकानूशतके हा समाज दयनीय व अप्रगत जीवन जगत होता. सामाजिक सुधारणेच्या किंवा प्रभोदनाच्या काळात काही समाजसुधरकांनी अस्पृश्यता निवारणचे कार्य केले. तथापी या सर्वांपैकी अतिशय निष्ठेने, स्वाभिमानाच्या आधारावर, अस्पृश्यांना या गुलामगिरीच्या बंधनातून मूक्त होण्यासाठी, जागृत संघटीत करण्याचे, शिक्षणाच्याद्वारे त्यांच्यात नवविचारांचा प्रसार करण्याचे व आत्मसन्मानाचा नवीन मार्ग दाखवण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे या राष्ट्रप्रमुखातील अग्रगण्य व कार्यशील प्रमुख नेते होते. निरनिराळया प्रयत्नांच्याद्वारे अस्पृश्यांना संघटनेचे व समतेचे शिक्षण देण्याचे श्रेय त्यांनाच द्यावे लागते. हजारो वर्षे अज्ञान, अन्याय व अत्याचाराला बळी पडलेल्या अस्पृश्य बांधवांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे व आपल्या हक्कांसाठी संघटीतपणे लढा देण्यासाठी त्यांना मनौधैर्य देणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले जीवीतकार्य मानले होते. उच्चविभूषित झाल्यानंतरही वैयक्तीक स्वार्थाच्या भूमिकेतून आर्थिक प्रलोभनांचा स्विकार न करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले सर्व जीवन दलित बांधवांच्या उन्नतीसाठी समर्पण केले. या कार्यात त्यांना हिंदू समाजातील उच्च वर्णियांचा विरोध सहन करावा लागला. वैचारीक व कृतीच्या पातळीवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या विरोधाला समर्थपणे तोंड दिले. प्रदीर्घ काळाच्या गुलामगिरीतून, अत्याचारातून आपल्या बांधवांची सुटका करून भारतीय घटनेनूसार त्यांना आपल्या आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. सपूर्ण भारतातील अस्पृश्य समाजाचा स्वाभिमान जागृत करुन त्यांना अन्यायाविरूध्द समर्थपणे लढण्यासाठी सज्ज करणारे नेते होय. अलौकिक बुद्दिमत्ता लाभलेले व सदैव विद्याव्यासंग, अनेक ग्रंथसंपदा निर्माण करणारे प्रगाढ विद्वान तसेच प्रजासत्ताक भारताच्या घटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय जनतेला ज्ञात आहेत.

## • डॉ. बाबासाहेब आंबेडकर व वृत्तपत्रे :-

वर्तमानपत्र हे समाजाच्या विचाराला चालना देणारे अतिशय उपयुक्त साधन आहे याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाणीव होती. भारतात अस्पृश्यांच्या मुक्ततेचा लढा चालविण्यासाठी वर्तमानपत्रांची त्यांना नितांत गरज वाटत होती. अस्पृश्य संघटन व संघर्षाच्या कार्याला लोकजागृतीच्याद्वारे गती आणण्यासाठी वर्तमानपत्र हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उपयुक्त साधन वाटत होते. वर्तमानपत्राद्वारे अस्पृश्यांवर होणारे अन्याय, अत्याचार, त्यांची दुःखे समाजासमोर मांडणे व स्पृश्य समाजातही परिवर्तनाचा विचार रूजविणे हा वृत्तपत्र सुरू करण्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रमुख हेतू होता. अस्पृश्यांच्या चळवळीमागील भूमिका स्पष्ट करणे व या चळवळीला केल्या जाणाऱ्या विरोधाला सडेतोड उत्तर देणे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वृत्तपत्रांची गरज वाटत होती. १९२० मध्ये छत्रपती शाहू महाराज यांनी दिलेल्या आर्थिक साहाय्याच्या मदतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरू केले. तथापि, हे पाक्षिक १९२३ मध्ये बंद पडले. या पाक्षिकाचे १९ अंक उपलब्ध असून त्यापैकी १२ अंकाचे संपादक स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लडला गेल्याने मुकनायक बंद पडले. महाडच्या चवदार तळयांच्या सत्याग्रहाच्यावेळी स्पृश्यवर्गाने केलेल्या टीकेला उत्तर देण्यासाठी ३ एप्रिल १९२७ मध्ये ख्बहिष्कृत भारतङ हे वृत्तपत्र सुरू करण्यात आले. हे वृत्तपत्र दलित चळवळीचे मुखपत्र होते. या वृत्तपत्राचे ३४ अंक निघाले. त्यापैकी ३३ अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अग्रलेख आहेत. हे वृत्तपत्र दोन वर्षे चालले. या वृत्तपत्रातून लोकहितवादींचे शतपत्रे पुन्हा प्रकाशीत करण्यात आली. या वृत्तपत्रातून दलित व त्यांचे वतन यावर लेख लिहिले. ब्राम्हणेतर चळवळ आणि पक्ष व या पक्षांच्या नेत्यांवरडॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच वृत्तपत्रांतून प्रखर टिका केली. अस्पृश्य, दलितांचा विकास हा त्यांच्या वृत्तपत्रीय लिखाणाचा हेतू होता. तथापि, या वत्तपत्रालाही लोकाश्रय न अल्पजीवी ठरले. ४ सप्टेंबर१९२७ रोजी समता संघ संस्था स्थापन केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या संस्थेचे अध्यक्ष होते. २९ जून १९२८ मध्ये समता संघातर्फे 'समता' पाक्षिक सुरू करण्यात आले. जून १९२६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्ग संस्था स्थापन केली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ नोव्हेंबर १९३० रोजी 'जनता' नावाचे पाक्षिक सुरू केले. ३१ आक्टोंबर १९३१ रोजी जनता

पाक्षिकाचे रूपातंर साप्ताहिकामध्ये केले. या साप्ताहिकाचे संपादक देवराम नाईक होते. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी जनता साप्ताहिकाचे नामकरण प्रबुध्द भारत असे केले.[१] हे पाक्षिक १९५६ पर्यंत चालू होते. देवराव नाईक, भा. र. कंरदेकर, अनंत चित्रे, य. दि. सहस्त्रबुध्दे, बी. सी. कांबळे व यशवंत आंबेडकरांनी या पाक्षिकाचे संपादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निर्भीड व ध्येयनिष्ठ पत्रकार होते. त्यांनी जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, ब्राम्हणशाही, हिंदू धर्म आणि ग्रंथावर प्रखर टिका केली. त्यांच्या या कार्यामुळेच अस्पृश्य जागृत होऊन संघटित झाले. तथापि ही पत्रे दिर्घकाळ चालले नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही वृत्तपत्रे अल्पजीवी ठरली असली तरी त्यांनी या वृत्तपत्रातून मांडलेल्या विविध विचारांवरून त्यांच्या झुंजार पत्रकारितेवर प्रकाश टाकता येतो. अस्पृश्यांवर अन्याय करणाऱ्या विविध विषयांची चर्चा त्यांनी या पत्रांमधून केली व अस्पृश्यांना जागृत करण्याचे कार्य केले. तसेच स्पृश्य वर्गाची टीका कशी स्वार्थमूलक आहे हे समाजासमोर स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या मूकनायक वत्तपत्रात पहिल्या अंकात म्हणतात 'आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तीचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वृत्तपत्रासारखी अन्य भूमीच नाही.'[२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाला विचारप्रवृत्त करणे, त्याला त्याच्या अस्तीत्वाची जाणीव करून देणे. आणि संघर्षोन्मुख करणे ही मानवी जीवनाला नवी दिशा देणारी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारली होती.आणि वृत्तपत्र त्यांना अत्यंत प्रभावी असे माध्यम वाटले होते. सुप्रसिध्द पत्रकार व संपादक व्हेलरी पायर्स याने आपल्या वृत्तपत्रात म्हटले आहे की, **'Without the blsck press, the black man would not know he his nor what is happening to his struggle for the freedom of citizenship'** जगात समान दु:खी आणि समान प्रश्नांसाठी लढणाऱ्या प्रवक्त्यांची जीवनसृष्टी कशी समान असते, हे या साम्यावरून दिसून येते. दडपल्या गेलेल्या, मनुष्यत्व हिरावून घेतलेल्या समाजाची युध्दे कधी संपत नसतात. जुनी युध्दे संपली की,पुन्हा नवी युध्दे आकाशात काळे ढग यावेत, त्याप्रमाणे जन्म पावतात आणि म्हणून अशा साधन वंचित समाजाला जागृत करण्यासाठी त्याला त्याचा इतिहास सांगावा लागतो. आणि त्यापेक्षाही त्याला त्याचे वास्तव्य जाणून द्यावयाचे असते. सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्वखोरांनी त्यांची मलिन केलेली प्रतिमा, त्यांची ठोकरलेली विश्वासार्हता, नवे जग निर्मिण्याची कुस्कारलेली दुर्दम्य आकांक्षा या संबधीची सत्ये प्रतिपादावयाची असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून हे अत्यंत आव्हाणात्मक आणि अवघड असे कार्य केले आहे. त्यांच्या वृत्तपत्रांनी केवळ अस्पृश्यांना व दलितांना जागविण्याचेच कार्य केले नाही, तर स्पृश्यांनाही आपल्या समाजद्रोही भूमिका तपासून पाहण्याचे आवाहन वारंवार केले. या आवाहनाच्या मागे समग्र भारतीय समाजाच्या एकसंघतेची व एकात्मतेची, समतेची व स्वातंत्र्याची मागणी होती. वृत्तपत्रे ही नैतिक पायावर उभी असली पाहिजेत, अशी त्यांची धारणा होती. परंतू भारतीय वृत्तपत्र सृष्टीकडून ही अपेक्षा करणे सर्वस्वी गैर होते. अर्थात काही ध्येयवादी मराठी वृत्तपत्रे होती आणि अपवादात्मक मानली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्रांकडे केवळ धंदा म्हणून पाहणाऱ्या वृत्तीचा निर्देश केला नाही. त्यांनी पुणे येथिल न्या. रानडे व्याख्यानमालेत वृत्तपत्रांसंबधी विचार मांडतांना म्हटले होते की, **'Journalism in India was once a Profession. It was now become a tread. It has no more function than the manufacture of soap.'** नैतिकता हा वृत्तपत्रांचा कणा असावा, असे मत मांडून ते थांबले नाही तर आपली सर्व वृत्तपत्रे त्यांनी याच भूमिकेतून सुरू केली होती.[३]

**मूकनायक :-** मूकनायकाचे संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसले तरी या वृत्तपत्राचे संगोपन, धोरण आणि अग्रलेख हे त्यांचेच राहत असत, तत्कालीन भारताच्या स्वातंत्र्यासंबधी ते आपले मांडत असतांना स्वराज्यापेक्षाही सुराज्याची आपल्याला गरज आहे. असे ते अग्रलेखात प्रखरपणे मांडत असत. मुकनायक पाक्षिक हे अल्पजीवी ठरले. परंतू त्यांनी या पाक्षिकामध्ये समाजाविषयी मांडलेले प्रखर मते क्रांतीकारक स्वरूपाचे होते.[४]

**बहिष्कृत भारत :-** बहिष्कृत भारत वृत्तपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी ३ एप्रिल १९२७ मधे सुरू केले. ते या वृत्तपत्राचे संपादक झाले. अस्पृश्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून तर दिलीच पाहिजे. परंतू त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला प्रखरपणे वाचा फोडण्यासाठी गरज आहे आणि त्यासाठी फक्त थंडपणे न बसता आपल्या पत्रातून जनजागरण करणे हेच सर्वार्थाने हितावह आहे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी विशद केले. त्यावेळच्या थोडयाफार शिकलेल्या शिक्षक वर्गाने निदान वृत्तपत्र विकत घेऊन वर्गणीदार होऊन कार्याचा वाटा उचलावा, अशी त्यांनी अपेक्षा केली होती, परंतू त्यांना नगण्य असा प्रतिसाद मिळाला. अशा प्रतिकूलतेतही त्यांनी आपले स्वकार्य तडीस नेण्याचा निश्चय केला आणि अंखड त्यांची लेखनी गरजली, बहिष्कृत भारताच्या झंझावताने महाराष्ट्रातील हिंदू समाजात एक प्रकारचे तुफान आले आहेअसे त्यांनी म्हटले होते ते सार्थ होते. त्यांचे लेखन बष्किृत भारतातील असो की, जनतेतील त्यांनी आपली लेखणी वाकविली नाही. ती ताठ होती. स्वाभिमानी होती, क्रांतीकारी होती आणि नवसमाज निर्मितीच्या ध्येयाने झपाटली होती.[५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कितीतरी विषयाचा मागोवा घेतला. हिंदू धर्म अणि हिंदू समाज यातील विषमतेवर त्यांनी ज्या परखडपणे लिहिले, तितक्याच परखडपणे त्यांनी हिंदूस्थानातील राजकीय प्रश्नास रस घेणाऱ्या अनेक राजकीय पक्षांच्या असंतूलीत भूमिका संबधी लिहिले. राष्ट्रवादाची आपली भूमिका त्यांनी अशी स्पष्टपणे मांडली तशीच ब्रिटिश राजवटीच्या संदर्भात त्यानी स्वतःचा अभिमान कधीच बाळगला नाही. उलट अशा मनोवृत्तीवर त्यांनी कडवटपणे टिका केली.[६]

**जनता :-** धर्मातंराविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी ‘जनता’ या पाक्षिकात आपले मत व्यक्त केले आहे. धर्मातंर हा मौजेचा विषय नव्हे. हा प्रश्न मानसाच्या जीवीताचा साफल्याचा प्रश्न आहे.जहाज एका बंदरातून दुसऱ्या बंदराला नेण्याकरिता नावाडयाला जेवडी पुर्वतयारी लागते तेवढीच पुर्वतयारी धर्मातंरासाठी करावी लागणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी धर्मातंरासंबधी दोन दृष्टींनी विचार केला होता तो म्हणजे सामाजिक व धार्मिक होय. धर्मातंर हे राष्ट्रनंतर नव्हे की वस्त्रानंतर अशी त्यांची स्वच्छ भूमिका होती. प्रांरभी हिंदू धर्म त्यागाचा निश्चय झाल्यानंतर नेमका कोणता धर्म स्विकारावा या संबधीची अनिश्चितता त्यांच्या अनेक लेखात दिसून आली . आणि पुढे कोणता धर्म स्विकारावयाचा हा प्रश्न निर्माण झाला. मात्र भारत देश हा संस्कृती महान देश आहे या देशात बौध्द धर्म त्यांना योग्य वाटला आणि त्यांनी बौध्द धर्मात प्रवेश केला. मात्र ते आपल्या ध्येयापासून विचलीत झाले नाहीत.[७]

**समता :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी समता नावाचे पाक्षिक सुरू केले होते. या पाक्षिकात त्यांनी रोटीबेटीच्या विरोधात काही कार्यक्रम हाती घेतले. बेटीबंदीची दाहक झळ स्वतःला लावून घेतली.[८] श्री गोरेगावकर नावाचे मराठा गृहस्थ आपण कट्टर सत्यशोधक असल्याचे लोकांना सांगत आणि एका दलित मुलीशी लग्न करण्याची आपली इच्छा आहे, असे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराना बोलून दाखवले. बेटीबंदी तोडण्याची ही चांगली संधी आहे. असे आंबेडकरांना वाटले असावे. त्यांनी व्ह. फा. झालेल्या एका दलित मुलीला तिच्या आई-वडिलांच्या संमतीने या लग्नास तयार केले. श्री. गोरेगावकर मुलीच्या घरी जावू-येऊ लागले. पण काही दिवसांनी अदृश्य झाले. तेंव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर खूप चिडले. नि एका अनूयायाने महत्प्रयसाने श्री गोरेगावकरांचा शोध लावून त्यांना परत आणले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी इंग्रजी शिव्यांची लाखोली गोरेगावकरांना वाहिली. नि च्या मुलीशी लग्न न करशील तर याद राखड’ असा दम त्यांनी भरला. गोरेगावकर लग्नास तयार झाले नि कायमचे अदृश्य झाले. हे गोरेगावकर चांगलेच लफंगे आहेत. असे पुढे कळले. मोठमोठया लोकांशी केलेला पत्रव्यवहार दाखवून ते इतरांना स्वतःच्या जाळयात ओढीत. ‘ब्राम्ह-बालिका हरण संघ’ नावाची संस्था स्वतःच्या खिशात असल्याने दाखवीत नि कोवळया ब्राम्हणेतर तरूणांना नादी लावीत असत. गरिबांना ऋणमुक्त करून दाखविण्याचा थापा मारून त्यांना फसविण्याच्या लफडयांत हे राजश्री पुढे तुरूंगात गेले नि तिथेच दिवगंत झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बेटीबंदी - निवारण्याच्या उत्साहावर मात्र त्यांनी थोडे पाणी ओतले होते.[९] अस्पृश्यांना जानवी घालण्याचे समारंभ केले. वैदिक पध्दतीने ३० मार्च १९२९ रोजी एक अस्पृश्य विवाह लावला. १९२८ मध्ये दादरच्या गणेश उत्सवात अस्पृश्यांचा सहभाग असावा म्हणून निदर्शनादी प्रयत्न केले. सुप्रसिध्द विडंबनकार आणि नाटककार आचार्य प.के. अत्रे हे ब्राम्हण असून त्यांचा एका वैश्य स्त्रीशी विवाह झाला म्हणून त्यांचे अभिनंदन केले. इत्यादी . १९२८ पासून सायमन कमिशन, महाड व नाशिक येथील सत्याग्रह, वर्तूळ परिषद वगैरेंकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकराना लक्ष द्यावे लागल्यामुळे समता संघ नि समता पत्र बंद करावे लागले.[१०]

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर व ग्रंथालये :-**

वर्तमानपत्रंप्रमाणेच आपल्या ग्रंथाद्वारे त्यांनी समाजाच्या प्रभोधनाचे व परीवर्तनाचे प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ग्रंथाला आपले गुरू मानत असत. परदेशात असताना बिविध विषयांवर त्यांनी सखोल चिंतन केले होते. कोणताही विषय मांडतांना त्याच्या सर्वांगीण बाबींचा योगय विचार करण्याचे व विषयाच्या गाभ्यांपर्यंत जावून संशोधन करण्याचे त्यांचे वैशिष्टे होते. त्यांनी लिहिलेला एकेक ग्रंथ म्हणजे त्यांच्या पांडित्याचा पुरावाच होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठी भाषेवर प्रभूत्व होते. तथापि त्यांनी सर्व ग्रंथ इंग्रजीतूनच लिहिले ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) Castes in India.**
**२) Problems of rupee, its Origin and its solution.**
**३) History of Indian Currency and Banking.**
**४) Federation versus Freedom.**
**५) Thrughton Pakistan.**
**६) Mr. Gandhi and Emancipation of te Untouchables**
**७) Who were the shudras**
**८) State Minorities**
**९) Untouchables**
**१०) Budha and Karl marx**
**११) The Riddles in Hinduism**
**१२) Budha and his Dhamma**[११]

या प्रमुख ग्रंथांचा उल्लेख करता येईल. ब्रिटिश राज्यकर्त्यांना भारतातील अस्पृश्यांची स्थिती समजावी त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराचे ज्ञान व्हावे ही यामागील भूमिका होती. सुशिक्षित अस्पृश्य समाजाला या ग्रंथाच्याद्वारे

जगातील प्रगत विचारसरणीचे ज्ञान व्हावे असा त्यांचा विचार होता. प्रारंभीच्या काळातील आर्थिक स्थिती व सिध्दातांविषयीचे त्यांचे प्रबंध व ग्रंथ नंतरच्या काळात हिंदू धर्माच्या मीमांसेच्या संदर्भात त्यांनी लिहिलेले ग्रंथ यावरून त्यांच्या असामान्य विद्वतेची व बुध्दीमत्तेची माहिती होते. शिक्षणसंस्था, वाचनालये, वृत्तपत्रे, सभा-संमेलने, परिषदा व विविध ग्रंथ इत्यादींच्याद्वारे अस्पृश्य समाजाला सुशिक्षित करण्याचे, त्यांना संघटित करण्याचे व आपल्या हक्कांच्या प्राप्तीसाठी प्रसंगी संघर्ष करण्यास सुसज्य बनविण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

- **सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून आणि ग्रंथातून विविध प्रश्नावर आपले विचार मांडले आहेत. त्यांनी बालविवाहपासून ते सहशिक्षणाप्रर्यंत , सहभोजन,आणि पुढे शेती, शेतकरी, खोतीशाहीपर्यंत, सत्याग्रहाचा सैध्दान्तिक विचार त्यांनी मांडला आहे. पण या सर्व लेखनाचे सूत्र प्राधानाने सामाजिक, सांस्कृतिक आणि नवसमाजनिर्मिती हेच होते. महात्मा गांधी, पंडित नेहरू, यापासून ते हिंदू महासभा, सत्यशोधक समाज या संदर्भातही त्यांनी प्रखर विचार मांडले आहेत. या सर्व लेखनातून प्रचंड अभ्यास, परखडपणा, तर्कशुध्दता, चिकित्सकता, सत्यान्वेषकता, साधारणता व बहूश्रुतता यांचे प्रत्यंतर येते. तेजस्वी विचारसरणी आणि धारदार भाषा, प्रतिपक्षावर अज्ञान आणि दंभावर कठोर प्रहार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनेकदा उपरोधगर्भ भाषेचाही वापर करतात. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपला विचार भाषेच्या फुलवऱ्यातून मांडलेले नाहीत. लोडाशी टेकून भाषा सजविण्याचा किंवा नखरेदार शब्दांचा सोस बाळगण्याची हौस त्यांना कदापही नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्व वृत्तपत्र व ग्रंथ लेखन चिंतनशील आहे. मार्मिक आहे. आणि कृतीस आवाहन करणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारप्रवर्तक लेखन, मराठी व इंग्रजी निंबध वाङःमयाचा अंलकारच होय. स्वतःची अशी स्वतंत्र शैली निर्माण करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी वृत्तपत्र सृष्टीला व इंग्रजी साहित्याला, वाङःमयाला व लोकजागृतीच्या चळवळीचे भान दिले आहे. सामाजिक न्यायमुल्याची जाणीव हीच त्यांच्या वृत्तपत्र सृष्टीला व ग्रंथ निर्मितीलाआधारशीला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथाकडे जर चिकित्सक, संशोधक नि तौलनिक दृष्टी टाकली तर पुढील निष्कर्ष आपल्या हाताशी येतात. (१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इतिहास मिमांसा स्थिर नव्हती, तर बदलती होती. (२) त्यांची जी धोरणे राजकारणात किंवा समाज कारणात ठरत, त्यांची पाठराखण ही इतिहास मिमांसा बऱ्याचवेळा खरी ठरते. (३) संशोधकाचा शुध्द सत्याविषयी जो आग्रह असतो तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुर्णपणे सोडला नव्हता. त्यांची इतिहास मिमांसा त्यांच्या धोरणांप्रमाणेच बऱ्याचवेळा बदलत असे., हे खरे आहे, पण कित्येकदा ते शुध्द सत्यही धरून ठेवीत असत.

- **संदर्भ ग्रंथ :-**

१) गोखले द.न., डॉ. आंबेडकरांचे अंतरंग, मौज प्रकाशन गृह मुंबई,२००३, पृ.क्रं.८७-९५.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मूकनायक वृत्तपत्र, ३१ जानेवारी १९२०.
३) उपरोक्त मूकनायक.
४) उपरोक्त मूकनायक.
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिष्कृत भारत वृत्तपत्र, ३ फेब्रुवारी, १९२८.
६) चांगदेव भवानराव खैरमोडे, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, खंड, २, १९५८, पृ.क्रं.१४९-५०.
७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जनता वृत्तपत्र, २० जून १९३६.
८) गोखले द.न., डॉ. आंबेडकरांचे अंतरंग, मौज प्रकाशन गृह मुंबई,२००३, पृ.क्रं.९५.
९) उपरोक्त पृ.क्रं.९८.
१०) उपरोक्त पृ.क्रं. ९५.
११) उपरोक्त पृ.क्रं. २४५-२६२.

----------------------------*****----------------------------

Journal of Research & Development Vol. 10 (Special Issue 4) January 2020, (ISSN-2230-9578)
COSMOS IMPACT FACTOR - 4.270

# इतिहासातील संशोधनाच्या पायऱ्या

प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा (इतिहास विभाग प्रमुख)
विद्या विकास मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय अक्कलकुवा, जि. नंदुरबार

**प्रस्तावनाः**

सामाजिक विज्ञानाच्या संशोधन पध्दतीपेक्षा इतिहासातील संशोधन पध्दती वेगळी आहे. प्रायोगिक संशोधन पध्दतीमध्ये निरीक्षणे वांरवार पाहिजे तितकी घेता येतात. पंरतु इतिहासातील घटनांची पुनरावृत्ती करता येत नाही. ऐतिहासिक काळात जी घटना घडून गेलेली असते ती पुन्हा घडत नाही. इतिहासकार डॉ.चंद्रा व डॉ.वर्मा यांनी असे म्हटले आहे की, "ऐतिहासिक संशोधन हे प्रयोगावर आधारित नसून ते निरीक्षणाच्या अहवालावर आधारित असते. आणि ज्याची पुनरावृत्त होऊ शकत नाही." (**Historical Research is not based upon experimentation but upon reports of observation which cannot be repeated**[१] ) ऐतिहासिक घटना घडून बराच कालावधी लोटल्यानंतर त्या घटनेचा शोध घेणे अवघड व क्लिस्ट असते. म्हणून त्याकरिता संशोधनासाठी उपयोगात आणावयाची साधनेसुध्दा वेगळी असतात. इतिहासाच्या भिन्न स्वरुपामुळे, इतर सामाजिक विज्ञान आणि इतिहासात काही बाबतीत फरक असतो. असे असले तरी सर्वसामान्य वैज्ञानिक पध्दती ऐतिहासिक संशोधनात देखील वापरता येते. ऐतिहासिक घटनांचे अध्ययन वैज्ञानिक पध्दतीने केले जाते. त्यालाच ऐतिहासिक संशोधन असे म्हटले जाते. ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या (Steps of Historical Research)

### १. संशोधन समस्येची निवड (Selection of the Research Problem):

संशोधन करतांना किंवा सर्वेक्षणाच्या प्रक्रियेमध्ये सर्वप्रथम संशोधन समस्येची निवड करावी लागते. समस्येची निवड करणे सहज आणि सोपे काम नाही. समस्येची निवड करतांना हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, त्या समस्येचे ऐतिहसिक विश्लेषण होऊ शकते का? तसेच समस्या अशा प्रकारची असावी की, त्याचे वर्तमानाशी संबधित अध्ययन केले जाऊ शकेल किंवा केवळ ऐतिहासिक अध्ययन शक्य होऊ शकेल. संशोधन समस्या किंवा विषय असा निवडला पाहिजे की, ज्याचे अध्ययन ऐतिहासिक संशोधन पध्दतीने करता येईल. उपलब्ध साहित्य, अध्ययन, आपली योग्यता, दुरदर्शिता, अंतर्दृष्टीच्या सहाय्याने संशोधनकर्ता आपल्या संशोधन विषयाची निवड करतो.

संशोधन विषयाची निवड करतांना संशोधकाने आपल्या आवडीचा विषय निवडणे महत्वाचे असते. त्या विषयात त्याला रुची असणे आवश्यक आहे तरच विषयाची निवड करावी. संशोधकाला त्या विषयात पुर्वज्ञान असणे गरजेचे असते. जर विषय अवघड असेल तर संशोधनकार्य करण्यास अडचनी येतात. अनेकदा संशोधनकार्य अपूर्णच राहते. पैसा आणि श्रम वाया जातो. तसेच संशोधन विषयाची मर्यादा ठरवावी. त्याने त्याच विषयावर फोकस केला पाहिजे. त्याचबरोबर संशोधनकर्त्याने आपण निवडलेल्या विषयाचे महत्व काय आहे त्याला सामाजिक व ऐतिहासिक महत्व कसे राहिल हे संशोधनकर्त्याने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. तसेच संशोधनासाठी पैसा जास्त खर्च होतो. हे संशोधनकर्त्याने लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार करुनच संशोधनकर्त्याने आपल्या विषयाची निवड करावी.

### २. गृहितकृत्याची निर्मिती (Formulation of Hypothesis) :

ऐतिहासिक संशोधनात गृहितकृत्ये हे फार महत्वाचे आहेत. ऐतिहासिक काळातील घटना, परिस्थिती इत्यादींचे प्रश्नाच्या स्वरुपात विश्लेषण करण्यासाठी गृहितकृत्ये उपयुक्त असतात. संशोधनकर्त्याला भूतकालीन घटनांची सप्रमाणता आणि विश्वसनीयता तपासून त्यांची कालक्रमानूसार मांडणी करावी लागते. म्हणून अशा संशोधनांमध्ये संशोधक कोणतेही गृहितकृत्ये मांडू शकत नाही. पंरतू गृहितकृत्ये नसलेल्या अध्ययनाचे निष्कर्ष निघू शकत नाही व विश्लेषणही करता येत नाही. ऐतिहासिक संशोधनाकरिता गृहितकृत्य हे औपचारिक आणि ज्यांचे परिक्षण होऊ शकेल असे असू शकत नाही. ते स्पष्ट विधानाच्या स्वरुपात लिहिलेले असते. आणि ते घटनेचा वृत्तांत आणि परिस्थितीचा अंदाज स्पष्ट करु शकते.

वॅन डालेन यांच्या मते स्पष्ट विधान किंवा गृहितकृत्यांची पध्दतशीर जागृतता ही तथ्ये महत्वपुर्ण आहेत काय याचे निर्धारण करणे, संशोधकर्त्याच्या कल्पना आणि तथ्यांमधील संबध स्पष्ट करणे यासाठी उपयोगी असतात, तसेच त्यामुळे अनावश्यक, पक्षपाती, चुकीची किंवा जुने गृहितकृत्य मांडण्याची शक्यता कमी केली जाते. **(An explicit statement, or a systematic awareness of the Hypothesis used in determining what facts were significant, clarifies the relationship between the investigators ideas and the facts be reports, and if minimizes the possibility of employing trivial, biased, conflicting, or archaic Hypothesis.[२])**

गृहितकृत्ये मांडतांना संशोधक प्रश्नांची निर्मिती करु शकतो, जी ऐतिहासिक घटनांचा शोध घेण्यासाठी अधिक उपयुक्त असतात. त्या प्रश्नांची उत्तरे पुरावा किंवा प्रमानाच्या आधारावर मिळविण्याच्या दृष्टीने संशोधक आपले संशोधन कार्य करु शकतो.

## ३. तथ्यांचे संकलन (Collection of Data) :

संशोधन विषयाची निवड आणि संशोधनाच्या संदर्भात स्पष्ट विधाने मांडल्यानंतर तथ्यांचे संकलन केले जाते. ऐतिहासिक तथ्यांचे संकलन करणे कठीण असते. म्हणून तथ्यांचे संकलन करतांना अत्यंत सतर्कता बाळगली पाहिजे. ऐतिहासिक तथ्यांचे प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन प्रकारची साधने आहेत. या दोन प्रकारच्या साधनाद्वारे ऐतिहासिक तथ्यांचे संकलन केले जाते.

### अ) प्राथमिक साधने (Primary Sources):

ऐतिहासिक घटना घडत असतांना प्रत्यक्ष साक्षीदार असलेल्या व्यक्तीने लिहून ठेवलेल्या, निर्माण केलेल्या किंवा तसल्यास इतर प्रकारच्या साधनांना प्राथमिक साधने असे म्हणतात. प्रत्यक्ष डोळयांनी साक्ष असलेले विवरण हे ऐतिहासिक चौकशीचे ठोस आधार असते. संशोधक गुड, बार आणि स्केटस यांनी त्यास तथ्यांचा पहिला साक्षीदार **(First Witnesses to a Fact[३])** असे संबोधले आहे. अवशेष किंवा मुळ रेकॉर्डस यांचा समावेश प्राथमिक साधनांमध्ये केला जातो. ते लिखित, चित्रमय, मौखिक प्रमाण, तांत्रिक रेकॉर्डस इत्यादी स्वरुपामध्ये असतो.

ऐतिहासिक प्राथमिक साधने पुढीलप्रमाणे :

१) उत्खनन २) पुराणवस्तू ३) नाणी ४) शिलालेख ५) ताम्रपट ६) चित्र ६) नकाशे ७) स्थापत्य मंदिर ८)किल्ले, महल ९) भौतिक अवशेष १०) समकालीन कागदपत्रे ११) गुप्त पत्रव्यवहार १२) जमाखर्च नोंदी १३) प्रश्नावली १४) धार्मिक सनदा १५) वृत्तपत्रे १६) आत्मचरित्रे व आठवणी १७) राजकिय तह व करार १८) रोजनिशी १९) राज्यकारभाराची पत्रे

१) खाजगी पत्रे

वरील साधने ही प्राथमिक साधनांमध्ये समाविष्ट केलेली आहेत. ऐतिहासिक संशोधनासाठी ही साधने अतिशय उपयुक्त आहेत. ज्यावेळी घटना घडत असते, ती घटना एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या डोळयांनी पाहिलेली असते, ती साधने म्हणजेच प्राथमिक साधने होय.

### ब) दुय्यम साधने (Secondary Sources) :

घटना घडून गेल्यानंतर त्या घटनेविषयी कुणाला तरी माहिती कळते, कुणाकडून ती माहिती ऐकली जाते. ती नोंदवली जाते. किंवा व्यक्तीने घटना, वस्तू किंवा परिस्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण न करता अहवालाद्वारे पुरविलेली माहिती म्हणजेच दुय्यम साधने होय. यामध्ये संशोधक प्रत्यक्ष साक्षीदार किंवा निरिक्षण करणाऱ्या व्यक्तीशी प्रत्यक्ष संपर्क साधून किंवा साक्षीदाराने लिहून ठेवलेली माहिती वाचून तथ्ये गोळा करतो. म्हणून अशा प्रकारच्या तथ्यास दुय्यम साधने असे म्हणतात. दुय्यम साधनाद्वारे मिळवलेली माहिती किंवा तथ्ये विश्वसनीय, खरे नसतात. घटनेत सहभागी असणाऱ्या व्यक्तीच्या अहवालात देखील मतभेद आढळून येतात. अशावेळी घटनेला साक्षीदार नसणाऱ्या व्यक्तीकडून ऐकीव माहितीच्या आधारे दिलेल्या तपशिलात सत्यता असेलच, असे निश्चित सांगता येत नाही. म्हणून दुय्यम साधने किंवा साधनांचा उपयोग संशोधकर्त्याने अधिक विचारपूर्वक करण्याची आवश्यकता असते. दुसऱ्यांनी लिहिलेले अहवाल, पुस्तके

इत्यादींचा दुय्यम साधनात समावेश होतो. संशोधनाचा प्रारंभ हा अशा प्रकारच्या दुय्यम साधनांच्या आधारे होत असला तरी शेवटी संशोधकाला प्राथमिक साधनांद्वारे तथ्यांचे संकलन करुन सत्याचा शोध घ्यावा लागतो.

ऐतिहासिक दुय्यम साधने पुढीलप्रमाणे :

बखरी, वंशावळी, कुळवटी, महजर, करीने, शकावल्या, वाङ:मय, दंतकथा, पोथ्या, खंडकाव्य, आत्मचरित्रे, चरित्रे, बाडे (भाड) काव्य, साहित्य, म्हणी, दंतकथा, पोवाडे, इंटरनेट, इत्यादी.

एखादी घटना घडत असतांना ती प्रत्यक्ष पाहिलेली नसते. परंतू त्यानंतरच्या काळात किंवा केंव्हातरी लिहिलेली असते. ते साधन दुय्यम साधन होय.

अशाप्रकारे संशोधनकर्ता प्राथमिक आणि दुय्यम साधनांद्वारे तथ्याचे संकलन करतो. संशोधनकर्त्याला पुर्णपणे दुय्यम साधनांवर अवलंबून राहता येत नाही. दुय्यम साधनांद्वारे मिळविलेल्या दुय्यम तथ्यांच्या सत्यतेची शहानिशा अतिशय काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. तसेच प्राथमिक साधनांद्वारे प्राप्त केलेली माहिती ही पुर्णपणे खरी आहे का? असा प्रश्न स्वतः संशोधकर्त्याने उपस्थित करुन प्राथमिक तथ्यांची देखील वस्तूनिष्ठपणे तपासनी केली पाहिजे. जर ती तथ्ये वस्तूनिष्ठतेच्या कसोटीवर उतरत असेल तर ती सत्यता आणि प्रमाणित मानली पाहिजे.

## ४. तथ्यांची मीमांसा (Criticism of Data):

ऐतिहासिक संशोधनात प्रत्यक्ष निरीक्षणाची संधी प्राप्त होत नाही. तर त्या घटना कितीतरी वर्षापूर्वी घडून गेलेल्या असतात. ऐतिहासिक घटनांची पुनरावृत्ती करणे शक्य नाही. म्हणून घडून गेलेल्या घटनांची सत्यता आणि महत्वपुर्ण माहिती विविध साधनांच्या आधारे प्राप्त करावी लागते. तथ्य संकलन ज्या साधनांद्वारे करण्यात आले त्या साधनांच्या वैधतेवरच संकलित तथ्यांची वैधता अंवलंबून असते. म्हणून ज्या साधनांद्वारे तथ्ये संकलित करण्यात आली. त्या साधनांची वैधता तपासून घेतली पाहिजे. ज्या पुराव्यांच्या आधारे सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला असतो. ते पुरावे देखील काळजीपुर्वक तपासले पाहिजे. तसेच संकलित करण्यात आलेल्या तथ्यांची सुद्वा काळजीपूर्वक पडताळणी करणे अनिवार्य असते. कारण संकलित तथ्ये दोषपुर्ण असतील तर त्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष देखील चूकीचे राहतील. म्हणून संकलित माहिती किंवा तथ्याची मीमांसा केली पाहिजे. तथ्यांची मीमांसा केल्यानंतरच त्याचा ऐतिहासिक पुरावा म्हणून उपयोग करणेयोग्य असते. प्राप्त माहिती किंवा तथ्यांची मीमांसा ही दोन प्रकारे केली जाते.

### अ) बाहय मीमांसा किंवा बहिर्गत परीक्षण (External Criticism) :

संशोधनकर्त्याने संकलित केलेली माहिती किंवा तथ्यांची विश्वसनियता निश्चित करण्याच्या प्रक्रियेला बाहय मीमांसा असे म्हणतात. बाहय मीमांसाला प्रतीची मीमांसा (**Lower Criticism**) म्हणतात. बाहय मीमांसेद्वारे ज्या स्त्रोताद्वारे तथ्याचे संकलन करण्यात आले त्या स्त्रोताच्या सत्यता आणि विश्वनियतेची तपासनी केली जाते. मौली यांच्यामते "बाहय मीमांसेचा हेतू हा खूप नकारात्मक नसून ऐतिहासिक सत्याची स्थापना करणे हा आहे." **(The Purpose of external Criticism is not so much negative as it the establishment of Historical teuth[४].)**

ऐतिहासिक तथ्यांची यथार्थता निश्चित करण्यासाठी संशोधनाजवळ भरपूर ऐतिहासिक आणि सामान्य ज्ञान असले पाहिजे. याबद्दल आपले विचार मांडतांना वॅन डालेन यांनी म्हटले आहे की, संशोधकाजवळ चांगल्या प्रकारच्या कालक्रमाचे ज्ञान, चपळ बुध्दी, चांगली विवेक बुध्दी, मानवी वर्तनास समजून घेण्याची बुध्दीमत्ता आणि चांगली भरपूर प्रमानात सहनशीलता आणि दृढता असली पाहिजे." **(The Researcher also need a good chronological sense, a versatile intellect, good common sense, an understanding of human behavior, and good plenty of patience and persistence.[५])**

अभिलेखाचा लेखक आणि काळ निश्चित करतांना स्वाक्षरी, हस्ताक्षर, लिपी, शुध्दलेखन, भाषा, शैली इत्यादीच्या आधारे निर्णय घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे शाई, रंग, कागद, शिला, वस्त्र, धातू, लाकूड इत्यादी गोष्टीचे भौतिक आणि रासायनिक परीक्षण करावे लागते. व्यक्ती, संस्था इत्यादी बाबतीत मिळनारी माहिती त्या विशिष्ट कालखंडातील माहितीशी कितपत जुळते ते पाहणे आवश्यक आहे. बाहय मीमांसेमुळे प्राप्त माहितीमधील फसवेपणा दूर होतो. परंतू या मीमांसेचा मुख्य हेतू ती माहिती कितपत अधिकृत आहे, याचा तपास करणे हा आहे.

## ब) आंतरिक मीमांसा किंवा अंतर्गत परीक्षण (Internal Criticism) :

संकलित कलेली माहिती किंवा तथ्यांच्या वैधतेचे मूल्यांकन करण्याच्या प्रक्रियेला आंतरिक मीमांसा किंवा अंतर्गत परीक्षण असे म्हणतात. प्राप्त माहिती किंवा तथ्ये ही अधिकृत असून देखील वैध नसण्याची शक्याता असते. प्राप्त माहिती व तथ्याची अचूकता व गुणवत्ता तपासणे हा आंतरीक परीक्षणेचा हेतू आहे. अनेकदा मूळ लेखात अनेक प्रकारचे बदल घडून येत असतात उदा. शब्दात बदल करणे, काही माहिती त्यातून काढून टाकणे, नवीन माहितीची भर घालणे, मूळ लेखातील क्रम बदलणे इत्यादी प्रकारचे बदल घडू शकतात. कधी कधी मूळप्रत जीर्ण झाल्यामुळे पुढील काळात नवीन प्रत तयार केली जाते. ज्यावेळी मूळप्रतीमध्ये बदल घडून येतो. मूळप्रतीतील अक्षर ओळखता न येणे, त्यातील काही भाग नष्ट होणे किंवा पुसट होणे यामुळे देखील मुळप्रतीत बदल होत गेल्यामुळे शेवटची प्रत पहिल्या मुळ प्रतीहून अगदी भिन्न असण्याची शक्यता असते. म्हणून लेखातील मूळ भाग कोणता याची काळजीपूर्वक मीमांसा करणे आवश्यक आहे.

ऐतिहासिक तथ्यांची बाहय व आंतरिक मीमांसा करण्याच्या प्रक्रियेत संशोधकाला उपयोगी असणाऱ्या प्रश्नांची सूची गुड, बार आणि स्केटस यांनी दिली आहे.[६] ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) लेखक कोण होता? यामध्ये केवळ त्याचे नावच नाही तर त्याचे व्यक्तीमत्व, चारित्र्य, स्थान इत्यादी कसे होते.

२) एक वार्ताहर किंवा वृत्तांत निवेदक म्हणून त्याची सामान्य पात्रता, चपळता, चारित्र्य, पक्षपात इत्यादी कशी होती.

३) एक वार्ताहर किंवा वृत्तांत निवेदक म्हणून त्याची पात्रता आणि अपात्रता कोणती होती?
   अ) घटनांच्या संबधात त्याला रुची होती काय?
   ब) घटनांच्या निरीक्षणासाठी त्याने कशा प्रकारचा संबध प्रस्थापित केला?
   क) घटनांच्या वृत्तांतासाठी आणि शिकण्यासाठी त्याच्याजवळ आवश्यक सामान्य आणि तांत्रिक ज्ञान होते काय?

४) घटनेनंतर किती लवकत त्याने त्यांचा वृत्तांत लिहिला?

५) स्मृतीच्या आधारे इतरांशी परामर्श घेतल्यानंतर, तथ्यांची सत्यता प्रमाणित केल्यानंतर किंवा सरुवातीच्या परीक्षा घेतलेल्या ड्राप्टचे एकत्रीकरण करुन प्रलेख लिहिला आहे काय?

६) हा प्रलेख इतर प्रलेखांशी कसा संबधीत आहे?

संशोधकाला वरील सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाल्यानंतर त्याला पुराव्यावर अशतः अवलंबून राहावे लागते. पुढे फार परिक्षण करण्याची आवश्यकता नाही. अशावेळी त्याला माहितीमधील दरी भरुन काढण्यासाठी तांत्रिक निगमनाच्या अनुमानावर अवलंबून राहावे लागते.

## ५) तथ्यांचे निर्वचन (Interpretation of Data):

तथ्यांचे संकलन आणि मीमांसा केल्यानंतर अध्ययन समस्येच्या अनुषंगाने तथ्यांचे निर्वचन करावे लागते. तथ्यांचे निर्वचन कार्य अतिशय गुंतागुंतीचे बनते आणि ऐतिहासिक तथ्यांच्या अद्वितीय किंवा वेगळया स्वरुपाचे विशेष महत्व प्राप्त होते. त्यामुळे संशोधकाजवळ विशेष कौशल्य आणि कल्पनाशक्ती असणे आवश्यक असते. ऐतिहासिक स्वरूपाच्या संशोधनामध्ये संशोधकाला कारणे आणि परिणामांचे विवेचन करतांना अतिशय सावधगिरी बाळगावी लागते. कारण त्याचे स्थान नैसर्गिक किंवा भौतिक विज्ञानाच्या संशोधकापेक्षा पुर्णतः वेगळे असते. भौतिक विज्ञानाचा संशोधक हा प्रयोगशाळेत एकटा बसून प्रयोग करीत असतो. तो प्रयोगशाळेत प्रयोग करुन आपले निष्कर्ष मांडतो. परंतू ऐतिहासिक संशोधन करणाऱ्या संशोधकाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. ऐतिहासिक कारणे ही अचल आणि गुंतागुतीची असतात. ऐतिहासिक संशोधकाला अशी तथ्ये स्विकारावी लागतात की जी केसेसची कारणे आणि परिणामांशी स्पष्टपणे संबधीत नाही. म्हणून मौली यांनी नमूद केले आहे की, "कारणत्व ही विज्ञानातील त्रासदायक संकल्पना आहे. ऐतिहासिक संशोधनांमध्ये तर ती दुप्पट त्रासदायक आहे. कारण त्यांमध्ये कारणे ही नियंत्रित वैज्ञानिक चेतनेऐवजी ऐतिहासिक स्वरुपाची किंवा आधिच निर्माण झालेल्या घटकाच्या स्वरुपात असतात." **(Causation is a troublesome concept in science it is doubly so in historical research where causes are in the nature of antecedents or precipitating factors, rather than causes in restricted scientific sense[७])**

**६.संशोधन अहवाल लेखन (Writing of ths Research Report):** संशोधनातील तथ्यांचे निर्वचन केल्यानंतर त्या संशोधनाचा अतिशय व्यवस्थित आणि क्रमबध्द अहवाल लिहिणे आवश्यक आहे. संशोधनाच्या अहवालामध्ये समस्याकथन किंवा समस्याचे विधान, संबधित साहित्याचे समालोचन, संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहितकृत्ये, सर्व्हे आणि तथ्यांचा स्त्रोत, तथ्य संकलन करण्याची पद्दत, तथ्यांचे वर्गीकरण, तथ्यांचा क्रम, मीमांसा, तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन, निष्कर्ष आणि संदर्भ ग्रंथसूची या सर्व गोष्टींचा समावेश करणे आवश्यक आहे. संशोधन अहवालाचे लेखन करण्यासाठी संशोधकाजवळ उच्च प्रकारची विद्वता असली पाहिजे. हे विश्लेषणात्मक कौशल्याचे काम आहे. म्हणून कल्पकता आणि प्रतिभेच्या गुणवत्ता व्यतिरीक्त सर्जनशिलता आवश्यक आहे. संशोधन अहवाल लिहिण्याच्या शैलीमध्ये संशोधक हा वस्तूनिष्ठ असला पाहिजे. खंडित आणि अपूर्ण स्वरुपाच्या ऐतिहासिक तथ्यांच्या आधारावर प्रमाणित सामान्यीकरण प्रस्थापित केले जाते. म्हणून सामान्यपणे हे मान्य करण्यात आले की, संशोधकाला ऐतिहासिक संशोधन अहवाल लिहितांना विषयनिष्ठ निर्वचन करण्याचे थोडे फार स्वातंत्र्य दिले पाहिजे. संशोधन अहवाल लिहितांना खात्री करुन घेतली पाहिजे की, संशोधन अहवाल पुरेसा व्यवस्थित आणि सत्यतेला कोणता बाधा आणणारा नाही.

अनेकदा ऐतिहासिक तथ्यांमधील पोकळीमुळे निर्वचन हे निरर्थक आणि असुरक्षित होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत संशोधकाने त्या तथ्यांमधील पोकळी स्पष्टपणे दर्शवावी आणि त्याने तेथेच थांबावे. असे असले तरी संशोधक पर्यायी विश्लेषण सुचवू शकतो. ऐतिहासिक संशोधनाचा अहवाल हा रुक्ष आणि आकर्षक नसलेला, शोभेचा आणि अलंकारिक नसावा. संशोधन अहवाल लक्षनाच्या शैलीतध्ये सत्यता, नियमितता, स्पष्टता आणि महत्वता असली पाहिजे[८].

**७. निष्कर्ष :** ऐतिहासिक संशोधन करत असतांना संशोधकाने संशोधनाच्या पायऱ्या (Steps of Histological Research) नूसार संशोधन करणे गरजेचे असते. संशोधनाचे विविघ टप्पे आहेत त्यामध्ये संशोधकाने सोपा, स्वतःला समजेल रूचेल पचेल असा विषय निवडावा तसेच संबधीत विषयात संशोधन झाले नसावे. ते पडताळून पाहणे. संशोधनाची रुपरेषा तयार करतांना गृहितकृत्ये निश्चित करावेत त्यावरच संशोधनाचे विश्लेषन व निष्कर्ष तयार केला जातो. संशोधन करत असतांना प्राथमिक साधनांचा वापर करावा. तरच संशोधन दर्जेदार असते. संशोधनांचे जे साधने गोळा केलेत त्यांचे बाहय व आंतरिक परिक्षण करणे महत्वाचे असते आपल्या विषयाशी संबधीत साधने निश्चित करणे. त्यानंतर संशोधन अहवाल लेखन करण्यास सुरुवात करावी. ठरावीक ठिकाणी तळटिपा देण्याचे करावे. संशोधनाच्या शेवटी संदर्भ ग्रंथ सूची देण्याचे करावे

## संदर्भ ग्रंथ सूची :


1) **Soti shivendra Chandra and Rajendra k. Sharma, - Research in Education Atlantic Publishers and Distributors, New Delhi, 1997, P.N..343.**
2) **Van Dalen, D.B.- Understanding Education Research, 1973, P.N.77.**
3) **Good, Barr, and Scaters, - Methodology of Educational Research, - Appleton Century, Crofts, Inc., 1935, P.N.253.**
4) **Mouly G.J. - The Science of Educational Research,- Van Nostrand Rinehart Company, 1970, P.N.270.**
5) **Van Dalen, Op. cit., P.N.270.**
6) **Good, Barr, and Scates, Op., cit.,P.N. 259.**
7) **Mouly G.J, Op. cit., P.N.214.**
8) **John W. Best and James V. Khan - Research in Education, Prentice Hall of India, Private Limited, New Delhi, 1989, P.N. 72 & 73.**


-----------------------------*****-----------------------------

24

# खानदेशातील दगड उद्योग व्यवसाय

प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा
इतिहास विभाग प्रमुख,
विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय
अक्कलकुवा, जि. नंदुरबार

***********

**प्रस्तावना -**

खानदेशात सहयाद्री पर्वत व सातपुडाच्या रांगा आहेत त्याचबरोबर याठिकाणी लहान-मोठे डोंगर द-या यांनी व्याप्त भू-भाग आहे. येथे उत्तम दर्जाचा दगड उपलब्ध होतो. खानदेशात उपलब्ध होणाज्या उत्तम दर्जाच्या दगडात काळा आणि चमकदार असा दगड सापडतो. पिंपळनेर आणि बागलाण परगण्यात अशा प्रकारचा दगड मोठ्या प्रमाणात आढळतो. हा दगड अग्निजन्य खडकापासून तयार झाल्या असल्याकारणाने तो अतिशय कठीण आणि टणक आहे. या दगडापासून घरगूती वापरासाठी खानदेशात अशा दगडापासून वेगवेगळ्या वस्तू व इमारती तयार केल्या जातात. दगड काढण्याचा व्यवसाय खानदेशंमधील विविध जातीतील लोक करित होते. त्यात प्रामुख्याने बेलदार, वडार, शिलावट, पाथरवट लोक या व्यवसायात पारंपारिक पध्दतीने दिसून येतात. अनेक पिढ्यांपासून हे लोक या व्यवसायात आढळतात. हे लोक वेगवेगळ्या गृहपयोगी वस्तू तयार करित होते. त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. विविध वस्तूंमध्ये प्रामुख्याने पाटा, वज्हाटा, उखळ, कुटणी (खल) जाते, भरडके, चरडके, कुंबी ही प्रामुख्याने लाकडीघर बांधतांना खांब उभा करण्यासाठी तळाला आधार देण्यासाठी वापरली जात होती. दिवा, दगडी चूल, दगडी इमारती, दगडी पुल इत्यादींच्या निर्मितीसाठी हे लोक काम करित होते.

**खानदेशात दगड उद्योग व्यवसाय -**

खानदेशात मध्ययुगापासून ते आधुनिक काळापर्यंत दगडांपासून वेगवेगळ्या वस्तू व इमारती तयार करण्याचा उद्योग व्यवसाय सुरू होता. मध्ययुगात मोगल राज्यकर्त्यांनी दगडांमध्ये उत्कृष्ठ इमारती आणि किल्ले बांधलेली आहेत. अकबर बादशहा आणि शहाजहान बादशहाने दगडामधून भव्य इमारती आणि किल्ले बांधली आहेत. यासाठी त्यांनी लाल दगडाचा वापर फत्तेपूर सिक्री, दिल्ली आणि आग्रा शहरामध्ये केलेला दिसून येतो.१ दगडापासून इमारती व किल्ले बांधत असतांना चुन्याचा वापर केलेला दिसून येतो. चुन्यावरती विशिष्ट प्रक्रिया करून तो चुना बांधकामासाठी वापर करत असत. ही बांधकामे अतिशय मजबूत आणि टिकाऊ होती. दगड वेगवेगळ्या राज्यातून प्राप्त केली जात होती. यामुळे अनेक राज्यात दगड तयार करण्याचा व दगडी फोडण्याचा उद्योग व्यवसाय सुरू होता. राजस्थान आणि खानदेशातून दगडाची वाहतूक करत असत.२

खानदेशातील वेगवेगळ्या परगण्यात लहान-मोठे डोंगर द-या आहेत तेथे उत्तम दर्जाची दगडांच्या खाणी आहेत. या दगडाचा रंग काळा आणि चमकदार आहे. या काळ्या दगडामध्ये बारीक-बारीक रेषा आणि चमकदार ठिबके दिसून येतात. उन्हात हा दगड अतिशय चकाकतो. पिंपळनेर आणि बागलाण परगण्यात हा दगड मोठ्या प्रमाणात आहे. जवळ-जवळ हा दगड अग्नीजन्य खडकापासून तयार झालेला आहे.३ हा दगड अतिशय कठीण आणि ठणक आहे. खानदेशात या दगडाचा वेगवेगळ्या वस्तू तयार करण्यासाठी व इमारत बांधकामासाठी वापर केला जात होता.

**१ दगड फोडणारे लोक -**

खानदेशात दगडांच्या बहुतेक खाणी डोंगरात आणि सातपुडा पर्वतात होत्या. याठिकाणी दगड काढण्याचा व्यवसाय वेगवेगळ्या जातीतील लोक करत होते. त्यांचा व्यवसाय पारंपरिकग्त्यिा चालू होता. अनेक पिढ्यापासून हे दगड फोडण्याचा व्यवसाय करत होते. त्यातील प्रमुख ठराविक जातींचा उल्लेख करता येईल.

**१.१ बेलदार -**

खानदेशात बारा बलुतेदारांपैकी बेलदार हा एक घटक होता. हे पूर्वीपासून खेड्यात मातीकामाचा प्रमुख व्यवसाय करत होते. नंतरच्या काळात उदरनिर्वाहसाठी त्यांनी विविध व्यवसाय स्विकारले. त्यामध्ये दगडी फोडणे, या दगडीतून घरबांधकामासाठी चौकांनी, आयताकृती अशा विविध आकाराच्या ते दगड तयार करत होते. याशिवाय पाटे-वरवंटे, जाते, उखळ इत्यादी गृहोपयोगी दगडीपासून वस्तू तयार करून विक्री करू लागले आणि त्यावर ते उपजिवीका भागवत होते.४ खानदेशात बेलदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहेत. प्रत्येक खेड्यात दहा ते पंधरा कुटुंबाची त्यांची घरे आहेत. शहरी भागात यांची संख्या जास्त प्रमाणात आहेत. चाळीसगांव परगण्यात बेलदारांची संख्या जास्त प्रमाणात दिसून येते. त्यापैकी बेलदारवाडी, चित्तेगांव, पिंपळवाडा, पिंपळगांव रोहिणी, करगांव, हातगांव, हिरापूर या गावांमध्ये बेलदारांची संख्या जास्त प्रमाणात आहे. बेलदारवाडी हे पूर्ण बेलदारांचे गाव आहे आणि रोहिणी गावात ६० ते ७० टक्के लोकांची संख्या बेलदारांची

आहे. या भागात मोठ्या प्रमाणात दगडापासून गृहोपयोगासाठी विविध वस्तू तयार करत होते.५ शहरामधील बेलदार दगड कामामध्ये उत्कृष्ठ बांधकाम करत असत.

**१.२ वडार -**

खानदेशात वडार ही भटकी जात आहे. यांचा व्यवसाय परंपरापासून दगडी फोडण्याचा आहे. त्याचबरोबर विहिरी खोदणे, विहिरीत सुरूंग लाऊन दगडी फोडायचे काम करत असत आणि दगडाच्या खाणीतून दगडी काढायचे काम वडार करत होते.६ हे सिनी हातोडीने दगड घडवायचे चांगल्या प्रकारे काम करत होते. खाणीतून मोठमोठे दगड काढून त्याचे लहान आकाराचे बांधकामासाठी आणि विविध वस्तू तयार करण्यासाठी वेगवेगळ्या आकाराच्या दगड तयार करत होते.७ खानदेशात सर्वात जास्त दगड फोडण्याचा व्यवसाय वडार समाज करतांना दिसून येतो. त्यांच्यामध्ये गाडीवडार, जाती वडार आणि माती वडार या पोटजाती आहेत.८

**१.३ शिलावट -**

खानदेशात दगडापासून गृहपयोगी वस्तू करण्यामध्ये शिलावट हे लोक प्रसिध्द आहेत. शिलावट ही एक पोटजात आहे.९ हे आपला उदरनिर्वाहसाठी पाटा वरवंटा, जाते, उखळ इत्यादी अनेक वस्तू तयार करून विकत होते. हा त्यांचा सगळ्यात मोठा व्यवसाय होता. हे लोक खेडेगावात सतत फिरत असतात. संबंधित गावात तंबू उभारून त्याच ठिकाणी दगडी वस्तू तयार करून विकत होते. याचबरोबर यात्रा, आठवडे बाजार इत्यादी ठिकाणी शिलावट लोक दगडांपासून बनवलेल्या वस्तुंची विक्री करत असत. यापासून त्यांना चांगल्या प्रकारे पैसे मिळत होते. खानदेशात हा त्यांचा उदरनिर्वाहासाठी एक मोठा उद्योग दिसून येतो.

**१.४ पाथरवट -**

वडार समाजातील पोट जात म्हणून पाथरवट ही एक जात आहे. यांचाही व्यवसाय दगडापासून वेगवेगळ्या वस्तू तयार करण्याचा आहे. हे लोक शिलावटांच्या नंतर दगडी वस्तू तयार करण्यास प्रसिध्द आहेत. यांनी तयार केलेल्या वस्तू अतिशय उत्तम आणि सुबक असतात. त्यामुळे या व्यवसायावरून त्यांना पाथरवट हे नाव पडलेले दिसून येते.१० या जातीतील लोक देखील दगडी फोडण्याचा व्यवसाय करत होते. वडार जातीप्रमाणेच हे लोक विहिर खोदण्याचे काम करत. विहीरीत बंदुकीच्या दारूच्या साहाय्याने सुरूंग लाऊन दगडी फोडत असत. त्याचबरोबर डोंगर, दऱ्या व पर्वतामधून दगडी काढण्याचा व्यवसाय देखील हे लोक मोठ्या प्रमाणात करत होते. ब्रिटिश काळात खानदेशात मोठ्या प्रमाणात इमारतीमध्ये बांधकामासाठी दगड लागत असे. त्यासाठी हे लोक दगडांची पूर्तता करत असत. परंतु पाथरवट समाजाचा प्रमुख व्यवसाय म्हणजे दगडापासून विविध वस्तू घडण्याचा होता ते सीनी हातोडीने हळूवारपणे वस्तू तयार करत असत. घडलेली वस्तू दिसायला आकर्षक असली पाहिजे. ही त्यांची हातकला राहत असे. या पाथरवट समाजातील लोकांच्या हातात उत्कृष्ठ कला असल्यामुळे त्यांचा व्यवसाय जोरदार चालत असे. त्यांना त्यांच्या व्यवसायात बायका-मुले देखील मदत करत असत.११

**२ दगडापासून गृहपयोगी वस्तू -**

खानदेशात दगडापासून बेलदार, वडार, शिलावट, पाथरवट इत्यादी जातीतील लोक वेगवेगळ्या गृहपयोगी वस्तू तयार करत होते. आणि त्यांच्यातून त्यांचा उदरनिर्वाह चालत असे. हा खानदेशात एक व्यवसायच निर्माण झालेला होता. हा व्यवसाय दिवसेंदिवस वाढत असतांना दिसून येतो. या उद्योगातील वेगवेगळ्या वस्तू आणि त्यांचा वापर मानवाच्या दैनंदिन जीवनात कसा उपयोग होत असे ते दिसून येईल.

**२.१ पाटा -**

मसाला वाटण्यासाठी वापरावयाच्या दगडाला पाटा म्हणत असत. हा दगडाचा पाटा चापट दगडासारखा असतो. त्याचा पृष्ठभाग सीनी हातोडी किंवा टाकीने खरबरीत केलेला असता. यालाच वऱ्हाटा पाटा म्हणजेच वरंवटा पाटा असे म्हणतात. या पाटावरती वऱ्हाटाच्या साहाय्याने मिरची, मसालात पाणी टाकून बारीक केला जात असे.१२ याचबरोबर इतर ओल्या अन्नधान्याची देखील वाटणी केली जात असे. या पाटा-वराटावरील भाजीत टाकलेला मसाला अतिशय चवदार लागत असे.

२.२ वऱ्हाटा -

वऱ्हाटा म्हणजे वरवंटा होय. याच्या साहाय्याने पाटावरती मसाल्याचे पदार्थ वाटतात.

**२.३ उखळ -**

दगडामध्ये खोलगट भाग असतो. त्याचा बराचसा भाग जमिनीत गाडलेला राहत असतो. त्यात लाकडी मुसळीच्या साहाय्याने मिरची बारीक करतात. याचबरोबर डाळीचे व तांदळाचे कवचदेखील साफ करत असतात.१३

**२.४ कुटणी (खल) -**

खलबत्ता हा लोखंडाचा असतो. तर ओलामसाला किंवा मिरच्यांचा ठेसा बारीक करण्यासाठी वापरावयाचा दगडाच्या खलबत्यासारखाच एक प्रकार असतो याला खल असे म्हटले जाते. उखळापेक्षा लहान व उथळ टोपीसारखा लांबट किंवा गोलाकार असतो. त्यामध्ये वापरावयाची मुसळी ही पण दगडाचीच असते. ती मुसळीवरून दर वेळी आदळून वस्तू बारीक न करता ती घासूनही बारीक तयार

करीत असत. याला खानदेशात कुटणी असे म्हणतात. ही कुटणी अर्धा फुट पेक्षा कमी उंचीची असते. यामधील मिरचीचा ठेसा व मसाला अतिशय चवदार लागतो.१४

**२.५ गरोठ -**

खानदेशात याला घट्या असे म्हणतात. लग्न समारंभ, गुंरासाठी रसद (दान) इत्यादी याच्यावरती दळले जातं होते. गरोठाचा आकार फार मोठा राहत असे. एक महिला हा गरोठ ओढू शकत नव्हती. खानदेशात कानुबाईचे रोठचे धान्य याच्यावरती गाणे म्हणून दळले जात होते.

**२.६ जाते -**

या जात्याचा वापर धान्य दळण्यासाठी केला जात होता. हे जाते ग्रामीण भागात प्रत्येक घरात राहत असे. याच्यावरती दळले जात होते. एक महिला हे जाते सहज ओढू शकत होती. ज्वारी, बाजरी, गहु, कडधान्य इत्यादी धान्य या जात्यावरती दळले जात असे.

**२.७ भरडके -**

जातेपेक्षा लहान प्रकाराला भरडके म्हटले जात होते. याच्यावरती डाळ भरडली जात होती. या भरडक्यात कडधान्याचे दोन भाग होत असे यालाच दाळ किंवा डाळ असे म्हणतात.

**२.८ चरडके -**

भरडक्यापेक्षा चरडके अतिशय लहान राहत असे. भरडक्यावरून दाळ तयार झाल्यानंतर चरडक्यावरती दाळीचे कवच किंवा टरफले काढले जात होते आणि दाळीला चकाकी येत असे.१५

गरोठ, जाते, भरडके आणि चरडक्याचे धान्य दळण्यासाठी जात्याची वरची तळी आणि खालची तळी अशा दोन प्रकारच्या दगडाच्या गोल तळी राहत असे. जात्याच्या खालच्या तळीला मध्यभागी खाली जमिनीत रूतणारा आणि वरच्या बाजूने वरच्या तळीच्या माखणीत या मध्ये बसणारा खुंटा राहत असे. हा माखणीचा खुंटा म्हणून ओळखला जात होता. हा लाकडापासून बनवला जात असे. ती वरच्या तळीच्या मोठ्या छिद्राला वरची तळी खुट्या भोवतीच फिरावी म्हणून मर्यादित करते. ते छिद्र खुंटा फसेल एवढेच राहते. त्यामुळे जात्याची वरची तळी खालच्या तळीवरून गोलाकार फिरू शकते. जात्याला दोन लाकडी खुंटा असतात. वरच्या तळीला जो खुंटा असतो त्याला जात्याचा खुंटा म्हणतात. त्याला धरूनच जाते फिरवले जाते आणि धान्याचे पीठ बाहेर निघते. त्यानंतर दुसरा जो खुंटा असतो त्या खालच्या तळीतून आरपार गेलेला असतो. त्यामुळे जात्याची खालची तळी जागेवरून हलत नाही. याचबरोबर जात्याच्या वरच्या तळीवर वजन वाढविण्यासाठी ठेवतात त्याला पेंड असे म्हणतात.१६ हे जात्याच्या मांडोळीवरती ठेवले जात असे. याचा आकार गोल राहत होता. पेंड दगडापासून बनवले जात होते.

**२.९ कुंबी -**

दगडापासून कुंबी तयार केली जात होती. ग्रामीण भागात लाकडी घर बांधतांना खांबा उभा करावा लागत असे. हा खांबा जमिनीच्या आत रूतून खचू नये या जमिनीशी त्याचा संपर्क येऊन त्यास किड लागू नये. म्हणून तो या दगडावर उभा केलेला असतो. तो म्हणजे दगडाची कुंबी होय. हा दगड बऱ्याच प्रमाणात चौकोनी किंवा गोलाकार राहत असे. तिच्यावरती वेगवेगळ्या प्रकारच्या हस्त कला आणि नक्षीकाम चारही बाजूंना सारखे राहत असे त्यामुळे कुंबी सुंदर आणि आकर्षक दिसते.१७ हे नक्षीकाम शिलावट व पाथरवट करत असत.

**२.१० दिवा -**

खानदेशात लोकांच्या वेगवेगळ्या धार्मिक देवदेवता होत्या. त्यांची पूजाअर्चा करण्यासाठी देवदेवतांसमोर दिवा लावला जात असे. तर हा दिवा जवळपास दगडाचा राहत होता. या दिव्यामध्ये तेल टाकून कापसाची त्यात वात टाकून दिवा पेटविला जात होता. ग्रामीण भागात घरात, मंदिरात या दिव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. बऱ्याचदा घरगुती वापरासाठी दिवा वापरला जात होता.१८ खानदेशात घरामध्ये प्रकाश किंवा उजेड निर्माण करण्यासाठी शक्यतोवर दगडाचाच दिवा वापरला जात असे हे दिसून येते.

**२.११ दगडी चूल -**

खानदेशात स्वयंपाक करण्यासाठी दगडाच्या चुलीचा वापर केला जात होता. पाथरवट आणि बेलदार दगडापासून चूल बनवत असत. चुलीसाठी वापरण्यात येणारा दगड अतिशय कठीण आणि मजबूत वापरला जात होता. कारण चूल तापल्यावर कच्ची दंगड राहिली तर चूल फुटण्याची शक्यता राहत असे. त्यामुळे चूल घडवणाऱ्या कागीरांना कोणत्या दगडपासून कोणती वस्तू तयार करायची हे त्यांना ज्ञान होते. खान्देशात जवळ-जवळ ९० टक्के लोक दगडी चूलवरती स्वयंपाक करतांना दिसून येत होते.१९

खानदेशातील ग्रामीण भागात जास्तीत जास्त वस्तू दगडापासून तयार केल्या जात होत्या. त्यामागील उद्देश असा होता की धातूपासून जी भांडी तयार केली जात होती ती ग्रामीण भागात मिळत नव्हती. त्या घेण्यासाठी शहरी भागात किंवा आठवडे बाजारात जावे लागत असे आणि सामान्या लोकांना धातूपासून तयार केलेल्या वस्तू परवडत नव्हत्या. दगडापासून तयार केलेल्या वस्तू स्वस्त आणि आरोग्याला पोषक अशा प्रकारच्या होत्या. दगडाच्या पाटा वरवंटा आणि कुटणी-खल मधील तयार केलेला मसाला अतिशय चविस्ट राहत असे. त्यामुळे खानदेशातील ग्रामीण लोकांची दगडपासून तयार केलेल्या वस्तूंना पसंती मोठ्या प्रमाणात होती. पाथरवट, शिलावट,

बेलदार व वडार समाजातील लोकांचा हा प्रमुख व्यवसाय निर्माण झाला होता. हे लोक खेड्यापाड्यात आणि आठवडे बाजारात गाढवाच्या पाठीवरती ठेऊन विक्री करत असत. त्यांना या व्यवसायातून चांगल्या प्रकारे पैसे मिळत होते.२० त्यातून त्यांचा उदरनिर्वाह चालत असे.

**३ दगडी इमारती -**

खानदेशात दगडांमध्ये चुना टाकून इमारती बांधल्या जात होत्या. असा उल्लेख अबूल फजल यांनी आईने-अकबरीत केलेला आहे. उत्तर भारतात लाल दगडांपासून आणि खानदेशात काळ्या दगडापासून इमारती व इतर घरांच्या भिंती तयार करण्यात येत होत्या.२१ खानदेशात काळ्या दगडाच्या खाणी मोठ्या प्रमाणात आहेत. सातपुडा पर्वतात आणि इतर डोंगर पर्वतात अग्निजन्य खडकापासून दगड निर्माण झालेला आहे. हा दगड अतिशय भक्कम आणि ठणक आहे. पावसाळ्यात अथवा उन्हाळ्यात या दगडाची झिज होत नाही. अनेक पिंढ्यापासून इमारती आणि घरे या दगडापासून निर्माण केली आहेत. या आजपर्यंत 'जैसे थे' स्वरूपात आहेत. वडार आणि बेलदार समाज हा दगड फोडण्याचा व्यवसाय करत होते. ते बऱ्याचदा बंदुकीच्या दारूचा वापर करून सुरूंग लाऊन दगड फोडत असत आणि त्यानंतर ते विशिष्ट आकाराच्या दगडी घडत असत. अशा घडलेल्या दगडी इमारती बांधकामासाठी वापर करत असत.२२

ब्रिटिशांनी सरकारी कार्यालये बांधण्यासाठी या दगडांचा वापर केलेला दिसून येतो. त्यामध्ये त्यांनी रेल्वे स्टेशन, प्रशासकीय इमारती, तुरूंग, ठराविक शाळा इत्यादींचे घडलेल्या दगडापासून बांधकाम केले आहे. नंदुरबार येथील रेल्वे स्थानक हे १८९८ मध्ये दगडात बांधकाम करून पूर्ण केलेले आहे. अमळनेर, चिंचपाडा, खामगांव रेल्वे स्टेशन, धुळे येथील तुरूंग, तंत्र निकेतन शाळा, राजवाडे संशोधन मंडळ इत्यादींचे ब्रिटिश शासकीय प्रशासन अंतर्गत बांधकामे तयार केली गेलीत. हे दगडी बांधकामे आजही उत्तम स्थितीत उभी आहेत. दगडी इमारतीमुळे ऊन, वारा, पाऊस, थंडी यांच्यापासून बचाव होत असतो. या इमारतींमध्ये निवास केल्यावर सर्व ऋतुंपासून मानवी जीवनाला आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर आहेत. खानदेशातील जवळजवळ बरीचशी रेल्वे स्थानके, सरकारी इमारतींचे कार्यालये, ब्रिटिशकालीन शाळा या सर्व इमारतींचे बांधकामे दगडांमध्ये झालेले दिसून येते.

**४ दगडी पुल -**

ब्रिटिशकालीन खानदेशात नदी नाल्यावरती वाहतूकीसाठी मोठ्या प्रमाणात पूल बांधण्यात आलेले होते. त्यामध्ये धुळे शहरातील १८८० मध्ये पांझरानदीवर असलेला पूल हा पूर्ण दगडामध्ये बांधकाम केलेले आहे. हा २९ कमानीचा पूल आहे. यामध्ये १५ कमानीची लांबी तीस फुटाची आहे. तर १४ कमानीची लांबी ८ फुटांची आहे. हा पुल आग्रा ते मुंबई राष्ट्रीय महामार्गावर आहे. त्याचबरोबर १८८० मध्ये धुळे-चाळीसगांव मार्गावर बोरी नदीवर पंधरा कमानींचा दगडी पुल होता. या कमानीपैकी ९ कमानी प्रत्येकी ५ फुट लांब आहेत. तर ६ कमानी २० फुटाच्या लांब आहेत.२३ हा पुल विंचूर गावाजवळ आहे. तसेच मेहुणबारे येथे तात्पुरत्या पुलाचे बांधकाम करण्यात आले. यासाठी १५०० रूपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला होता. त्यापैकी ९२१ रूपये खर्च करण्यात आलेले होते.२५ त्याचबरोबर धुळे ते चाळीसगांव रस्त्यावरील मेहुणबाऱ्याजवळ एक तात्पुरता पूल बांधण्याचे काम सुरू करण्यात आले होते. संबंधीत पुलासाठी २५०० रूपये निधी मंजूर करण्यात आलेला होता.२६ हा पूल नदीला पूर आल्यामुळे पाण्यात वाहून गेला आहे असे नमूद करण्यात आले आहे.

खानदेशात इ.स.१८८० मध्ये लोहमार्गावर पाच मोठे पूल होते. त्यापैकी तीन पूल तितूर, बोला व कोरूंडा या गिरणाच्या उपनद्यावर होते. नशिराबादजवळ ३०० यार्ड रूंदीच्या वाघूर नदीवर दहा कमानींचा लोखंडी तुळईवरील बांधकाम विशारद वारन यांच्या तत्वावर आधारित असा पूल होता. पुढे दहा कमानीपैकी पाच कमानी काढून त्या भरण्यात आल्या. या कमानी पूर्णपणे दगडांमधून बांधकाम केलेले आहे. भुसावळच्या पुढे हा लोहमार्ग तापी नदी ओलांडतो तेथे नदीचे पात्र ५३९.४९ मीटर (५९० यार्ड) रूंद असून पुराच्या वेळेस पाण्याची पातळी २३.७७४ मीटर (७८ फुट) पर्यंत वाढते. त्यासाठी तेथे सुरूवातीस ८००.१ मीटर (८७५ यार्ड) लांबीचा पुल बांधलेला होता. या पुलास प्रत्येकी १३८ फुट लांबीचे पाच व ६० फुट लांबीचे १४ ओपनिंग असून त्यावर लोखंडी तुळ्या आणि प्रत्येकी ४० फुटाच्या २० कमानी होत्या. तापी तसेच वाघूरचे पात्र भक्कम खडकाचे असल्याने पुलासाठी भक्कम पाया लाभलेला आहे. याच्या कमानी दगडांनी तयार केल्या आहेत. १८७२ मध्ये तापी नदीवर हा पूल तयार करण्यात आला होता. हा अतिशय भक्कम आणि मजबूत पूल आहे. तो आजही वापरात आहे.२७ याचबरोबर नंदुरबार परगण्यातील शहराच्या आजूबाजूला एक-एक कमानीचे दोन पूल आहेत. तसेच भादवड गावाजवळ चार कमानीचा दगडी रेल्वे पूल आहे. या पुलासाठी काळ्या दगडांचा वापर केलेला दिसून येतो.

ब्रिटिशकाळात पश्चिम खानदेशात धुळे येथील पुलाबरोबर साक्री-पिंपळनेर-नंदुरबार-प्रकाशा या रस्त्यावर पिंपळनेर येथे पांझरा नदीवरती संपूर्ण दगडांनी बांधकाम केलेला पूल आहे. गोमती नदीवर सोनगीर-दोंडाईचा-शहादा-खेतीया या रस्त्यावरती लोणखेडा जवळ दगडी पूल निर्माण केलेला आहे. सुरत-धुळे राष्ट्रीय महामार्ग पांझरा नदीवर नेरजवळ आणि लोंढ्या नालावरती नेर ते कुसुंबा दरम्यान

दगडी पूल आहे. त्याचबरोबर बोरी नदीवर नंदुरबार-साक्री रस्त्यावर वासदरे या गावाजवळ दगडी पूल आहे आणि पांझरा नदीवर पिंपळनेर साक्री-नंदुरबार-प्रकाशा या रस्त्यावर साक्री येथे दगडांमध्ये पुलाचे बांधकाम करण्यात आले होते.२८

खानदेशात पिंपळनेर बागलाण परगण्यात उत्तम दर्जाच्या दगडाच्या खाणी आहेत. या परिसरात दगड खाणंकाम उद्योग मोठ्या प्रमाणात चालत होता. बेलदार, पाथरवट, वडार आणि शिलावट या समाजातील लोक दगड फोडण्याचा व्यवसाय करत होते. दगड घडवून इतर परगण्यात देखील दगड विक्री करत असत. ही विक्री शेकडा प्रमाणे म्हणजे शंभरावरती विक्री केली जात होती. शंभर दगडांना २ ते ३ रूपये दिले जात होते. दिवसाकाठी एका कारागिराला ६ ते ८ आणा मेहनाता म्हणून मिळत होता.२९ अशा प्रकारे खानदेशात दगड उद्योग व्यवसाय चालू होता.

**निष्कर्ष :-**

खानदेशचा बराचसा भू-भाग हा लहान-मोठे डोंगर द-या यांनी व्याप्त आहे. तेथे उत्तम दर्जाचा दगड उपलब्ध होतो. खानदेशात उपलब्ध होणाऱ्या उत्तम दर्जाच्या दगडात काळा आणि चमकदार असा दगड सापडतो. पिंपळनेर आणि बागलाण परगण्यात अशा प्रकारचा दगड मोठ्या प्रमाणात आढळतो. हा दगड अग्निजन्य खडकापासून तयार झाल्या असल्याकारणाने तो अतिशय कठीण आणि टणक आहे. खानदेशात अशा दगडापासून वेगवेगळ्या वस्तू व इमारती तयार केल्या जातात. दगड काढण्याचा व्यवसाय खानदेशमधील विविध जातीतील लोक करित होते. त्यात प्रामुख्याने बेलदार, वडार, शिलावट, पाथरवट लोक या व्यवसायात पारंपारिक पध्दतीने दिसून येतात. अनेक पिढ्यांपासून हे लोक या व्यवसायात आढळतात. हे लोक वेगवेगळ्या गृहपयोगी वस्तू तयार करित होते. त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. विविध वस्तूंमध्ये प्रामुख्याने पाटा, व-हाटा, उखळ, कुटणी (खल) जाते, भरडके, चरडके, कुंबी ही प्रामुख्याने लाकडीघर बांधतांना खांब उभा करण्यासाठी तळाला आधार देण्यासाठी वापरली जात होती. दिवा, दगडी चूल, दगडी इमारती, दगडी पुल इत्यादींच्या निर्मितीसाठी हे लोक काम करित होते. खानदेशात इ.स.१८८० मध्ये धुळे-चाळीसगांव लोहमार्गावर पाच मोठे फुल बांधले गेले हे सर्व पुल दगडांच्या साहाय्याने बांधण्यात आले होते. सन १८७२ मध्ये तापीनदीवर बांधण्यात आलेल्या पुलात दगडाचा जास्त प्रमाणात वापर केलेला दिसतो. लोहमार्गाप्रमाणेच खानदेशातील अनेक रस्त्यांवर ठिकठिकाणी दगडीपुल बांधण्यात आले होते. एकंदरीत खानदेशात पिंपळनेर, बागलाण परगण्यात उत्तम दर्जाच्या दगडाच्या खाणी आहेत. या परिसरात दगड खाणकाम उद्योग चालत होता. बेलदार, पाथरवट, वडार आणि शिलावर या जातीचे लोक दगड फोडण्याचा व्यवसाय करित होते. दगड घडवून इतर परगण्यात देखील दगड विक्री केली जात होती. त्यामुळे या व्यवसायातील कारागीर व मजूरांना चांगला मोबदला मिळत होता व त्यांना आपला उदरनिर्वाह भागवण्यासाठी हया व्यवसायाचा मोठा आधार होता.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१) फजल अबूल (अनुवाद) शर्मा हरीवंशरॉय- आईने अकबरी, महामना प्रकाशन, इलाहाबाद १९६६, पृ.क्र.१६५.

२) उपरोक्त- पृ.क्र.१६५.

३) माजिद हुसेन - फन्डामेन्टल ऑफ फिजिकल जॉगरॉफी, रावत पब्लिकेशन जयपूर न्यु. दिल्ली बंगलोर इत्यादी (चतुर्थ आवृत्ती) २०१२, पृ.क्र.१३३-१३६.

४) चव्हाण रामनाथ नामदेव - जाती आणि जमाती, मेहता पब्लिकग हाऊस, पुणे १९८९, पृ.क्र.९५.

५) सिलेक्शन फॉर्म द रेकॉर्ड ऑफ बाम्बे,एस. पेपर्स, चाळीसगांव तालुका १८९६, पृ.क्र.३-४.

६) वालुंजकर टी.एन. व इतर (संपा).- पाठक अे.एस, गॅझेटिअर ऑफ महाराष्ट्र, लॅन्ड अॅन्ड पीपल, इडिशेन्स गॅझिटिअर डिपार्टमेन्ट, गर्व्हमेन्ट ऑफ महाराष्ट्र मुंबई, २००९, पृ.क्र.१०५.

७) उपरोक्त- पृ.क्र.१०५.

८) देवगांवकर एस.जी. - महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर २००९, पृ.क्र.४०१.

९) पाटील भी.ना.- खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ, (१९००-१९५०), प्रकाशक भूषण भिमराव पाटील पाचोरा,जुन २००५, पृ.क्र.८६.

१०) वालुंजकर टी.एन. व इतर (संपा.)- पूर्वोक्त पृ.क्र.१०५.

११) उपरोक्त- पृ.क्र.१०५.

१२) सुर्यवंशी रमेश- खानदेशातील कृषक जीवन, सचित्र कोश, प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुबई २००२, पृ.क्र.१५.

१३) उपरोक्त.

१४) उपरोक्त.

१५) उपरोक्त.

१६) उपरोक्त. पृ.क्र.२५.

१७) उपरोक्त.- पृ.क्र.७.

१८) देवगांवकर एस.जी. - महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती, पूर्वोक्त पृ.क्र.२७७.

१९) सुर्यवंशी रमेश - खानदेशातील कृषक जीवन, पूर्वोक्त

पृ.क्र.७.

२०) माजिद हुसेन - इकॉनॉमिक जॉगरॉफी, पूर्वोक्त पृ.क्र.३४३.

२१) फजल अबूल (अनुवाद) शर्मा हरीवंशरॉय- पूर्वोक्त पृ.क्र.१६५.

२२) खानदेश जिल्हा गॅझेटिअर, पृ.क्र.२२५.

२३) धुळे जिल्हा गॅझेटिअर, पृ.क्र.५६८-५७१.

२४) खानदेश जिल्हा गॅझेटिअर, पूर्वोक्त पृ.क्र.२११.

२५) जनरल रिपोर्ट ऑफ द ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ द बॉम्बे प्रेसीडेन्सी ॲन्युअल रिपोर्ट फॉर द एअर- १८६६-६७, गव्ह.सेन्ट्रल प्रेस बॉम्बे पृ.क्र.२४१.

२६) उपरोक्त- पृ.क्र.२५४.

२७) खानदेश जिल्हा गॅझेटिअर, पूर्वोक्त पृ.क्र.२११.

२८) धुळे जिल्हा गॅझेटिअर, पूर्वोक्त पृ.क्र.५८९.

२९) खानदेश जिल्हा गॅझेटिअर, पूर्वोक्त पृ.क्र.२२५.

❑❑❑

25

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार

**प्रा.डॉ. रमेश तु. देशमुख**
मराठी विभाग प्रमुख,
सिध्दार्थ महाविद्यालय जाफ्राबाद, जि. जालना

**********

**प्रस्तावणा**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारतातील युगपुरुष म्हणुन ओळखले जातात. त्यांनी विविध क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, स्त्री-पुरुष समानता, समाजशास्त्राचे अभ्यासक, कामगार नेते, ग्रंथकार, पत्रकार, विज्ञान, कुशल प्रशासक, कृषीतज्ज्ञ, धर्मशास्त्र, समता, राजकारणी, जलनियोजक, मानवतावाद, समिक्षक, धम्मविचार या आणि अशा विविध क्षेत्रातून त्यांनी आधुनिक भारताला दृष्टी देण्याचे काम केले आहे. ते सर्वोत्तम नेत्यामध्ये, विद्वानामध्ये, समाजक्रांतीकारकामध्ये नेहमीच अग्रस्थानी राहिले आहेत. त्यामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर आधुनिक भारताचे शिल्पकार ठरतात. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीयांच्या सर्वांगीण कल्याणाचा विचार केला आहे. तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यांचा विचार करुन आधुनिक भारतासाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांची भाषणे आणि लिखित ग्रंथ यांचा विचार केला असता, त्यांनी ज्ञान, विज्ञानाबरोबर अनेक क्षेत्रात नावलौकिक केला आहे. त्याचा उपयोग आधुनिक भारत घडण्यास होत आहे. यावरुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहूआयामी व्यक्तीमत्व असल्याची कल्पना येते. त्यांनी स्वतःला आजन्म विद्यार्थी म्हणून घेतले आणि ज्ञानार्जन केले.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. त्यामुळे त्यांनी बहूजनांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. हा अधिकार त्यांनी भारतीय संविधानातून दिला आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण विषयी म्हणतात की,'शिक्षण हे विकासाची वाट आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता